# स्त्रीयांचा जमिनीवरील अधिकार

## कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण साहित्य




स्त्री अभ्यास केंद्र
आयएलएस विधी महाविद्यालय

सोसायटी फॉर प्रमोटिंग पार्टीसिपेटीव्ह इकोसिस्टीम मॅनेजमेंट (सोपेकॉम)



अर्थसहाय्य: SWISSAID Inspiring courage. स्विसएड इंडिया, पुणे

जून २०१८

# स्त्रीयांचा जमिनीवरील अधिकार



## कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण साहित्य


जया सागडे

सीमा कुलकर्णी

स्नेहा भट

पल्लवी हर्षे



स्त्री अभ्यास केंद्र
आयएलएस विधी महाविद्यालय

सोसायटी फॉर प्रमोटिंग पार्टीसिपेटीव्ह
इकोसिस्टीम मॅनेजमेंट (सोपेकॉम)

अर्थसहाय्य: SWISSAID Inspiring courage. स्विसएड इंडिया, पुणे

जून २०१८

**स्त्रीयांचा जमिनीवरील अधिकार**
कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण साहित्य

**स्त्री अभ्यास केंद्र, आयएलएस विधी महाविद्यालय, पुणे**
**सोपेकॉम, पुणे**

जून २०१८

अर्थसहाय्य :
**स्वीसएड इंडिया**

मुखपृष्ठ, रेखाचित्रे आणि मांडणी : प्राईम एंटरप्राईझेस, पुणे

संपर्क :
सोपेकॉम, १६ काळे पार्क, सोमेश्वरवाडी रोड, पाषाण, पुणे ४११००८
फोन : ०२० २०२५११६८, २५८८६५४२
इमेल : soppecomgmail.com
वेबसाईट : www.soppecom.org

# ऋणनिर्देश

स्त्री अभ्यास केंद्र, आयएलएस विधी महाविद्यालय, पुणे आणि सोपेकॉम, पुणे यांनी महिला आणि जमिनीवरील अधिकार ह्या विषयावरील प्रशिक्षणांचा उपक्रम २०१७–१८ मध्ये राबवला. सदर प्रशिक्षणांच्या निमित्ताने हा प्रशिक्षण संच तयार करण्यात आला आहे.

या प्रशिक्षण साहित्याच्या निर्मितीसाठी आम्ही सर्वप्रथम स्विसएडचे आभार मानू इच्छितो. त्यांच्या अर्थसहाय्याशिवाय हे प्रशिक्षण साहित्य निर्माण करणे शक्य झाले नसते.

या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी विविध संस्थानी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्या संस्थांचे व जे कार्यकर्ते या प्रशिक्षणात प्रत्यक्ष सहभागी झाले त्यांचेही मनापासून आभार. त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवातून व उत्स्फूर्त सहभागामुळे हे प्रशिक्षण साहित्य अधिक समृद्ध झाले. यामधील हेलो मेडिकल फौंडेशन व मानवलोक या संस्थांनी विशेष मदत केली त्याबाबत त्यांचे विशेष आभार.

ह्याच काळात सोपेकॉम आणि स्त्री अभ्यास केंद्र, आयएलएस विधी महाविद्यालय ह्यांनी महिला किसान अधिकार मंच (मकाम)च्या वतीने मराठवाडा विभागासाठी एक तलाठी प्रशिक्षण आयोजित केले होते. त्या उपक्रमाअंतर्गत तलाठ्यांसाठी महिलांच्या अधिकारांसंबंधी एक प्रशिक्षण साहित्य तयार करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण साहित्य तयार करत असताना त्या उपक्रमातील अनुभवदेखील महत्वाचा होता. तलाठी प्रक्षिणाच्या उपक्रमासाठी अर्थसहाय्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे आभार मानणे आम्हांला महत्वाचे वाटते.

आयएलएस विधी महाविद्यालय आणि सोपेकॉम मधील आमचे सहकारी ज्यांनी या उपक्रमासाठी वेळोवेळी मदत केली त्यांचा या ठिकाणी विशेष उल्लेख करावा लागेल.

कार्यकर्त्यांना महिलांच्या हक्कांसाठी काम करण्यात उपयोगी ठरेल असे हे प्रशिक्षण साहित्य सादर करताना आम्हाला आनंद होतो आहे. पुढील काळात अधिक कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याची संधी मिळेल अशी आशा आहे.

स्त्री अभ्यास केंद्र, आयएलएस विधी महाविद्यालय, पुणे

सोपेकॉम, पुणे

# अनुक्रमणिका

पार्श्वभूमी / १

लिंगभाव / २

हिंदू वारसा हक्क कायदा / ८

मुस्लीम वारसा कायदा / २०

जमीन हस्तांतरणाचा कायदा आणि महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम / **२५**

सार्वजनिक संसाधनांवरील अधिकार / **२९**

जमिनीवरील हक्कांसंबंधीच्या प्रक्रिया / **३२**

थोडक्यात महत्वाचे... / ३७

समारोप / ४०

# पार्श्वभूमी

हे प्रशिक्षण साहित्य स्त्री अभ्यास केंद्र, आयएलएस विधी महाविद्यालय आणि सोपेकॉम ह्यांनी घेतलेल्या 'स्त्रीयांचा जमिनीवरील अधिकार' ह्या विषयावरील कायद्याच्या प्रशिक्षणांवर आधारित आहे. ह्या प्रशिक्षणांची कल्पना स्विसएड इंडिया मराठवाड्यात करत असलेल्या महिलांवरील कौटुंबिक हिंसाचारासंबंधीच्या कामातून पुढे आली. अशा हिंसापिडीत महिलांना समुपदेशनाच्या माध्यमातून मदत करण्याचे काम मानवलोक आणि हेलो मेडिकल फौंडेशन ह्या मराठवाड्यातील दोन संस्था करत आहेत.

त्यांच्या कामातून हे लक्षात आले की महिलांवर होणारा हिंसाचार आणि त्यांचा मालमत्तेवर हक्क नसणे ह्याचा परस्परांशी जवळचा संबंध आहे. बहुतेक वेळा महिला आपल्या वडिलोपार्जित संपत्तीमधील अधिकार सोडून देतात, आणि सासरच्या मालमत्तेमध्ये हक्क मिळविणेही त्यांना कठीण जाते. ह्यामुळे त्यांच्यावर हिंसा होण्याची शक्यता आणखी वाढते. विदर्भाप्रमाणेच मराठवाड्यातदेखील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढते आहे. अशा कुटुंबातील विधवा महिलांचा जमिनीवरील हक्क हा देखील एक महत्वाचा प्रश्न आहे. हिंसाचाराचा सामना करणाऱ्या ह्या महिलांना समुपदेशनाबरोबरच त्यांचा मालमत्तेवरील अधिकार मिळवून देणे गरजेचे आहे. महिलांना मालमत्तेमध्ये हक्क मिळवून देण्यासाठी कायदे अस्तित्वात असले तरी प्रत्यक्षात तो मिळविण्यासाठी महिलांना अनेक सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक अडथळ्यांचा सामना करावा लागतो. एकीकडे महिलांना त्यांचे हक्क मिळविणे सोपे व्हावे ह्यासाठी कायद्यात बदल करणे, कायदेशीर व्यवस्था अधिक सक्षम करणे ह्यासारखे उपाय करावे लागतील. पण त्याच बरोबर गावपातळीवर महिलांच्या अधिकारांसाठी काम करू शकतील असे सक्षम पॅरालीगल कार्यकर्ते निर्माण करणे ही आवश्यक आहे.

अर्थात भूमिहीन कुटुंबांतील महिलांच्या हक्कांचा वेगळा विचार करावा लागेल. परंतु भूधारक कुटुंबांतील हिंसापिडीत महिला, ज्यांना मालमत्तेमधून बेदखल केले जाते, त्यांना ह्या कायद्यांचा उपयोग करून त्यांचा संपत्तीमधील अधिकार मिळवून देणे गरजेचे आहे.

ह्या पार्श्वभूमीवर गावपातळीवर पॅरालीगल कार्यकर्त्यांची एक फळी तयार करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम हा एक छोटा प्रयत्न आहे. ह्या प्रशिक्षणानंतर हे कार्यकर्ते महिलांना त्यांचे संपत्तीवरील अधिकार मिळवून देण्यासाठी मदत करू शकतील अशी ह्यामागची कल्पना आहे.


# लिंगभाव

स्त्रियांचे समाजात कायमच दुय्यम स्थान असलेले आपल्याला दिसून येते. लिंगगुणोत्तर, साक्षरता ह्यासारख्या निर्देशकांशी संबंधित आकडेवारी बघितली तर हे अधोरेखित होते. स्त्रिया आणि पुरुषांमधली असमानता ही समाजाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा सर्व पातळ्यांवर पसरलेली आहे. संसाधनांचा विचार करताही तिच परिस्थिती आहे. शेती करण्यामध्ये जरी मोठ्या प्रमाणात स्त्रिया सहभागी असल्या तरी जमीन आणि इतर संसाधनांवर त्यांची मालकी मात्र त्या प्रमाणात नाही असे दिसून येते. महिलांच्या ह्या वंचिततेचा विचार आपल्या समाजातील पितृसत्ताक व्यवस्थेच्या संदर्भात करायला हवा.

## पितृसत्ताक व्यवस्था

पितृसत्ता ह्या संज्ञेचा शब्दशः अर्थ 'वडिलांचा/ कुटुंबप्रमुख पुरुषाचा अंमल' असा म्हणता येईल. सुरुवातीला ही संज्ञा एका विशिष्ट प्रकारच्या कुटुंबव्यवस्थेसाठी – ज्यामध्ये संयुक्त कुटुंबातील कुटुंबप्रमुख पुरुषाच्या अधिपत्याखाली कुटुंबातील इतर तरुण पुरुष, महिला, लहान मुले रहात असत – वापरण्यात येत होती. परंतु आता तिचा उपयोग अधिक व्यापक अर्थाने पुरुषांचे वर्चस्व, सत्तासंबंधांमध्ये पुरुषांचे वरचे स्थान, आणि वेगवेगळ्या प्रकारे महिलांना मिळणारे दुय्यम स्थान दर्शविण्यासाठी केला जातो.


पितृसत्ताक व्यवस्थेचे तपशील जरी वेगवेगळे असले, तरी ती जगभरात सगळ्याच समाजात दिसून येते. म्हणजेच सामान्यतः कोणत्याही स्त्रीला आयुष्यात दुय्यमतेचा, शोषणाचा अनुभव येतच असतो. मग ती स्त्री कोणत्याही वर्गाची, जातीची, धर्माची असो. दुय्यमता, अन्याय ह्यांचे तपशील वेगळे असतील पण त्यामागील सूत्र एकच आहे. महिलांना येणारे दुय्यमतेचे अनुभव हे विविध प्रकारचे आणि विविध पातळ्यांवर येणारे असतात. ते जसे कुटुंबाच्या पातळीवर येतात तसेच ते कामाचे ठिकाण, सार्वजनिक जागा, तसेच सरकारी यंत्रणा ह्याठिकाणी ही येतात.




सर्व समाजांमध्ये पितृसत्ताक व्यवस्थेचे स्वरूप सारखे असणार नाही. वेगवेगळ्या समाजात, तसेच एकाच समाजातील वेगळ्या गटांमध्ये, तिचे स्वरूप वेगळे असेल. तसेच ते काळानुरूपही बदलत जाईल. मागच्या दोन पिढ्यांमागील स्त्रीला आलेले दुय्यमतेचे अनुभव हे आजच्या स्त्रीच्या अनुभवांपेक्षा वेगळे असतील. तसेच भारतातील स्त्रीचा शोषणाचा अनुभव हा पाश्चात्य देशामधील स्त्रीच्या अनुभवापेक्षा वेगळा असेल. भारताच्या संदर्भात बघितलं तर एका उच्चजातीय स्त्रीचे आणि दलित स्त्रीचे अनुभव वेगळे असतील. ह्या प्रत्येक समाजात पितृसत्तेचे स्वरूप आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या सामाजिक-सांस्कृतिक रिती ह्या वेगळ्या असल्या तरी त्यामागील सूत्र एकच आहे – सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय व्यवस्थांवरील पुरुषांचे वर्चस्व.

पितृसत्ताक व्यवस्था ही स्त्रियांचे दुय्यम स्थान टिकविण्यासाठी त्यांच्या पुढील गोष्टींवर नियंत्रण ठेवते – महिलांचे श्रम, पुनरुत्पादन शक्ती, लैंगिकता, संचारस्वातंत्र्य, संपत्ती आणि इतर संसाधने. समाजातील व्यवस्थांचे विश्लेषण केले तर दिसून येते की कुटुंब, धर्म, कायदा, प्रसारमाध्यमे, शिक्षणसंस्था, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था ह्या सर्व व्यवस्था पितृसत्ताक असतात. समाजात पितृसत्ताक व्यवस्था टिकवून ठेवण्याचे काम ह्या व्यवस्था करतात. पितृसत्ताक व्यवस्थेची मुळे अशाप्रकारे खोलवर रुजलेली आहेत, आणि त्यामुळेच ती नैसर्गिक आहे आणि बदलता येणार नाही असे वाटते.

पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये स्त्रियांचाही सहभाग असतो. जसे की आई आपल्या मुलीपेक्षा मुलाला अधिक चांगली वागणूक देते, किंवा सासू सुनेच्या हक्कांवर गदा आणते इत्यादी. परंतु स्त्रिया अशाप्रकारे पितृसत्तेमध्ये का सहभागी होतात ह्यामागील कारणे समजून घेतली पाहिजेत. एक तर स्त्रियासुद्धा ह्या पितृसत्ताक व्यवस्थेचाच भाग असतात आणि त्यांच्यावरही वेगवेगळ्या मार्गाने ही व्यवस्था जन्मापासून बिंबविली गेली असते. त्यामुळे त्यामधील रीतींचे त्या देखील अनुकरण करतात. दुसरे म्हणजे आहे ह्या व्यवस्थेमध्ये आपल्यासाठी स्थान निर्माण करण्याचा, सत्ता मिळविण्याचा स्त्रिया प्रयत्न करत असतात आणि हे करत असताना बहुतेक वेळा दुसऱ्या स्त्रीवर त्याचे परिणाम होतात. अनेकदा पितुसत्तेबद्दलच्या चर्चेमध्ये एक स्त्रीच कशी दुसऱ्या स्त्रीवर अन्याय करते अशा प्रकारचा युक्तिवाद केला जातो. परंतु त्यामागे असणारे हे सत्तासंबंधांचे राजकारण समजून घ्यायला हवे.



पितृसत्तेचा उगम कसा झाला ह्याबाबत वेगवेगळ्या विचारवंतांनी वेगवेगळी मांडणी केलेली आहे. फ्रेडरिक एंगल्स ह्या मार्क्सवादी विचारवंतांच्या मते खाजगी मालमत्तेचा उदय आणि पितृसत्ताक समाज व्यवस्था ह्यांचा जवळचा संबंध आहे. माणूस ज्यावेळी रानटी अवस्थेत जगत होता त्यावेळी लिंगाधारित श्रमविभागणी अस्तित्वात नव्हती. स्त्रियांच्या श्रमांचे महत्व होते. परंतु जसा माणूस शेती आणि पशुपालन ह्यामुळे स्थिर झाला आणि टोळी युद्धांमधून संपत्तीचा साठा केला जाऊ लागला तशी खाजगी संपत्तीची संकल्पना उदयाला आली. युद्ध आणि शिकार ही दोन पुरुषांची क्षेत्रे होती त्यामधूनच अतिरिक्त संपत्ती तयार होत होती. त्यामुळे हळूहळू स्त्रियांच्या कामाला दुय्यम मानण्यात येऊ लागले. आपली संपत्ती आपल्याच वारसांना मिळावी म्हणून बापाचा मुलांवरील हक्क प्रस्थापित करण्यासाठी स्त्रियांच्या लैंगिकतेवर बंधने आली आणि स्त्रियांसाठी एकपतित्वाची चाल सुरु झाली. कालांतराने ही बंधने अधिक कडक होत गेली.



उमा चक्रवर्ती ह्यांनी भारतातील पितृसत्ताक व्यवस्थेच्या उगमाबद्दलच्या अभ्यासात म्हटले आहे की इतिहासपूर्व काळात स्त्रियांच्या श्रमाला आणि मूल जन्माला घालण्याच्या शक्तीला महत्व होते. परंतु जेव्हा आर्यांनी येथे मोठ्या भूभागावर सत्ता प्रस्थापित केली आणि मूळ जमातींवर वर्चस्व मिळविले त्याच सुमारास पुरुषप्रधान विचारप्रणालीचा उगम झाला. जिंकलेल्या स्त्रियांच्या लैंगिकतेबरोबरच त्यांच्या स्वतःच्या समाजातील स्त्रियांच्या लैंगिकतेवरही बंधने आली. खाजगी संपत्ती आणि जातीची शुध्दता राखली जावी ह्यासाठी स्त्रियांच्या संचारावर, लैंगिकतेवर कडक निर्बंध लादण्यात आले.

पितृसत्ता आणि तिचा उगम ह्याबद्दल सर्व संस्कृतींना/ समाजांना लागू पडेल असा एकच सिद्धांत नाही. परंतु आर्थिक उत्पादनातील स्त्रियांना नाकारला गेलेला सहभाग, बळ, हिंसा, विचारप्रणाली ह्या अनेक घटकांमुळे पितृसत्ता अस्तित्वात आली आणि आजपर्यंत टिकून राहिली आहे.


## लिंगभाव

पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये स्त्रियांची दुय्यमता नैसर्गिकच आहे असे भासवले जाते. परंतु ते खरे नाही. स्त्री आणि पुरुष ह्यांच्या शरीररचनेमध्ये निसर्गाने प्रजनन कार्याचा फरक केलेला आहे. त्याव्यतिरिक्त कोणताही फरक नैसर्गिक नाही. इतर सर्व फरक हे समाजाने स्त्री – पुरुष ह्यांचे वर्तन कसे असावे ह्याबद्दल केलेल्या अपेक्षांमधून तयार होतात, आणि म्हणूनच ते नैसर्गिक नसून सामाजिक असतात.

प्रत्येक समाजात स्त्री म्हणजे काय आणि पुरुष म्हणजे काय ह्याबाबत काही रूढ संकेत असतात. त्यातील अनेक गोष्टी ह्या नैसर्गिकच असतात असे मानले जाते. उदाहरणार्थ स्त्रिया जात्याच समजूतदार असतात किंवा निसर्गतःच पुरुष ताकदवान असतात अशा प्रकारची विधाने सतत ऐकू येत असतात. पण नीट तपासून पाहिले तर ह्या सगळ्या गोष्टी नेहमी तशाच असतात असे नाही तर त्या समाज आणि कालानुरूप बदलत गेलेल्या दिसतात.

समाजात एखादी व्यक्ती स्त्री आहे की पुरुष आहे ह्यावरून त्या व्यक्तीने कसे वागावे, कसे राहावे ह्याबाबत काही अपेक्षा केल्या जातात. नियम ठरवले जातात. ह्यालाच लिंगभाव असे म्हणतात. प्रत्येक समाजातील स्त्री – पुरुष प्रतिमांमध्ये संस्कृतीप्रमाणे फरक पडत जातो. तो त्या समाजाचा लिंगभाव असतो. कालानुरूप लिंगभाव बदलत जातो. पूर्वीच्या काळातील स्त्री प्रतिमा आणि आताच्या काळातील स्त्री प्रतिमा ह्यामध्ये बदल झालेला दिसतो.

व्यक्तीचे लिंग जन्माने ठरत असले तरी लिंगभाव हा समाजात वावरत असताना आत्मसात केला जातो. व्यक्तीवर लिंगभाव लादण्याची प्रक्रिया जन्मापासून सुरू होते आणि सतत चालू असते. ह्या प्रक्रियेमुळे लिंगभाव हा नैसर्गिकच आहे असे भासू लागते.



उदाहरणार्थ – मुलांना विज्ञान/ गणित ह्या विषयांची आवड असते तर मुलींना सामाजिक शास्त्रांची असे मानले जाते. प्रत्यक्षात मुलींना विज्ञान/ गणित अशा विषयांचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन दिले जात नाही. तसेच अनेक मुलींना ह्या गोष्टी शिकण्यासाठी

रोजच्या जबाबदाऱ्यांमधून अवकाश मिळत नाही. लहानपणापासून सोपे पर्याय निवडणे त्यांच्यासाठी कसे अधिक चांगले आहे हे त्यांच्यावर ठसवल्यामुळे त्या तसे करणे पसंत करतात.

लहानपणापासूनच काय कपडे घालायचे, काय खेळ खेळायचे, कसे वागायचे हे मुलांना आणि मुलींना वेगवेगळे शिकवले जाते. आणि तेव्हापासूनच लिंगभाव आत्मसात करायला सुरुवात होते. ह्यामध्ये आपली शिक्षण पद्धती, प्रसारमाध्यमे त्याचबरोबर धर्म, विवाह, कुटुंब, शासन ह्यासारख्या संस्था हे भर घालत असतात. ह्या माध्यमांमधून समाजातील लिंगभावाची संकल्पना अधिक रूढ केली जाते.

समाजातील लिंगभावाच्या संकल्पनेमुळे स्त्री आणि पुरुष दोघांवरही बंधने येत असतात. परंतु ह्या सर्व प्रक्रियेत स्त्रियांच्या वाट्याला दुय्यम तर पुरुषांच्या वाट्याला उच्च दर्जा, अधिक स्वातंत्र्य, अधिक सत्ता येते. स्त्रिया ह्या नैसर्गिकरित्या दुय्यम आहेत असे मानले जाते आणि स्त्री आणि पुरुष ह्यांच्यामध्ये भेदभाव केला जातो.

## लिंगभावावर आधारित श्रमाची विभागणी : उत्पादक आणि पुनरुत्पादक कामे



पुरुषसत्ताक व्यवस्थेचा एक महत्वाचा विशेष म्हणजे लिंगभावावर आधारित श्रमाची विभागणी. प्रत्येक समाज स्त्रिया आणि पुरुषांची विशिष्ट कामे ठरवत असतो. समाज, संस्कृती किंवा काळाप्रमाणे लिंगभावावर आधारित श्रमाची विभागणी बदलते. परंतु सामान्यपणे समाजात स्त्रियांची कामे ती बिनमोलाची कामे आणि पुरुषांची कामे म्हणजे मोलाची कामे असे मानले जाते.

कामाच्या स्वरूपानुसार उत्पादक कामे आणि पुनरुत्पादक कामे असे कामांचे दोन प्रकार केले जातात. उदरनिर्वाहासाठी विविध वस्तूंचे उत्पादन, सेवांचा पुरवठा, शेती आणि व्यापार ही उत्पादक कामे समजली जातात. ह्या श्रमांना काम म्हणून मान्यता आणि पैशाच्या स्वरूपात किंमत मिळते.

ह्याउलट घर सांभाळणे, घरातील प्रत्येकाची काळजी घेणे, मुलांना जन्म देणे, त्यांना वाढवणे, स्वयंपाक, धुणे-भांडी, स्वच्छता, पाणी भरणे ही सर्व पुनरुत्पादक कामे समजली जातात. माणसाच्या जगण्यासाठी ही सर्व कामे आवश्यक असली तरीही त्याला पैशाच्या रुपात किंमत मिळत नसल्याने ती बिनमोलाची कामे समजली जातात.

स्त्री मुलाला जन्म देत असल्याने काळजी घेणे हा तिचा नैसर्गिक गुणच आहे असे गृहीत धरून पुनरुत्पादनाची सर्व कामे बहुतेक वेळेस स्त्रीचीच आहेत असे मानले जाते. ही कामे बिनमोलाची असतातच पण ही वेळखाऊ, कष्टाची आणि कठीणही असतात. ह्याबाबतीत कामाची विभागणी कडक असलेली दिसते. स्त्रिया आणि पुरुष दोघेही उत्पादक कामांमध्ये सहभागी असले तरीही पुनरुत्पादक कामांची जबाबदारी मात्र बहुतेक वेळा फक्त स्त्रियाच उचलत असतात.

## लिंगभेदावर आधारित हिंसा

स्त्रियांवर होणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या हिंसाचाराच्या बातम्या आपण ऐकत असतो, आजूबाजूला पाहातही असतो. हिंसेचे स्वरूप व्यापक आहे. फक्त डोळ्यांना दिसते तीच हिंसा नसून अनेक पातळ्यांवर अप्रत्यक्षपणेही हिंसा होत असते. उदाहरणार्थ मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणे ही एक प्रकारची हिंसा आहे. हिंसेचे स्वरूप हे केवळ शारीरिक नसून लैंगिक, भावनिक, तसेच वंचितता असेही असू शकते. हिंसा कशाला म्हणायचे हे बदलत्या काळ, संस्कृती आणि सामाजिक-राजकीय परिस्थितीप्रमाणे बदलत असते.

सत्ता आणि हिंसा ह्यांचा जवळचा संबंध असतो. समाजात सत्तेचे असमान वाटप झालेले आहे. सत्ता मिळविणे, टिकवणे, व वाढवणे ह्या संघर्षातून हिंसा होते. सत्ता कायम ठेवायला व ती वाढवायला आर्थिक, सामाजिक, धार्मिक अशा विविध प्रकारच्या हिंसेचा वापर केला जातो. समाजातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या कमकुवत असणाऱ्या घटकांवर किंवा संख्येने कमी असलेल्या समूहांवर (गरीब, असंघटीत क्षेत्रातील कामगार, अल्पसंख्य, दलित इ) हिंसा होण्याची शक्यता अधिक असते. समाजाने आखून दिलेल्या चौकटीत न बसणारे, किंवा चौकटी मोडणारे (परित्यक्ता, लग्न न केलेल्या स्त्रिया, समलिंगी व्यक्ती, एड्स सारखे आजार झालेल्या व्यक्ती इ) हे अधिक असुरक्षित असतात. कौटुंबिक पातळीवर पितृसत्ताक व्यवस्थेच्या उतरंडीमध्ये जो सर्वात खाली असेल त्याच्यावर (न कमावणारी व्यक्ती, लहान मुले, वृद्ध, विधवा, फक्त मुलीच असणाऱ्या स्त्रिया) हिंसा होण्याची शक्यता अधिक असते. थोडक्यात कुटुंबात-समाजात व्यक्तीचे स्थान जितके खाली तितकी असुरक्षितता जास्त, आणि जितकी असुरक्षितता जास्त तेवढी हिंसेची शक्यता अधिक.

जगभरात सगळीकडे स्त्रियांना लिंगभेदावर आधारित हिंसेचा सामना करावा लागतो. लिंगभेदावर आधारित हिंसा म्हणजे केवळ स्त्री म्हणून जन्माला आल्याने सोसावा लागणारा त्रास किंवा सहन करावी लागणारी हिंसा. बदलत्या सामाजिक - आर्थिक परिस्थितीनुसार हिंसेचे स्वरूप बदलते आहे आणि प्रमाणही वाढते आहे. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीला कोणत्या ना कोणत्या हिंसेला तोंड द्यावे लागते. ह्याची सुरुवात अगदी मुलीच्या जन्माच्या आधीपासून लिंगनिदान चाचणी करून मुलगी असल्यास गर्भपात करून घेण्यापासून होते. घर, शाळा, कामाचे ठिकाण, सार्वजनिक जागा ह्या सर्व ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे स्त्रियांना हिंसेला सामोरे जावे लागते. बालविवाह, शिक्षणाचा हक्क नाही, छेडछाड, एकतर्फी प्रेमातून हल्ला, नवऱ्याकडून मारहाण, हुंड्यासाठी मागणी, कामाच्या ठिकाणी दुय्यम वागणूक, लैंगिक अत्याचार अशा विविध प्रकारे ही हिंसा समोर येते.

## लिंगभाव आधारित संसाधनांची मालकी

महाराष्ट्रात शेती करणाऱ्या एकूण लोकांपैकी ४०% तर शेतमजुरांपैकी ५०% ह्या महिला आहेत (जनगणना, २०११). परंतु जमिनीच्या मालकीच्या संदर्भात हीच आकडेवारी बघितली तर भूधारक महिलांचे प्रमाण मात्र केवळ १५% आहे असे दिसते (कृषी गणना २०१०-११).

शेतीमधील कामाचे बहुतेक ओझे महिला उचलतात, कष्टाची आणि वेळखाऊ कामे त्या करतात. परंतु जमिनीवर मालकी नसल्याने त्यांना शेतकरी म्हणून ओळखले जात नाही. जमीन नावावर नसल्याने शेतीसाठीच्या विविध योजना, तसेच क्रेडीट इत्यादी गोष्टींचा त्यांना फायदा घेता येत नाही. सासरच्या घरातून बाहेर पडण्याची वेळ आल्यास जमिनीवर हक्क नसल्यास महिलांपुढे उपजीविकेचे फारसे पर्याय उरत नाहीत.



स्त्रियांच्या जीवनातील ज्या घटकांवर पितृसत्तेचे संपूर्ण वर्चस्व असते त्यामधील संपत्ती/ मालमत्ता हा एक प्रमुख घटक आहे. जमीन, घर ह्यासारखी सर्व मालमत्ता पुरुषांच्या नावावर असते. ती एका पुरुषाकडून दुसऱ्या पुरुषाकडे हस्तांतरित करण्याची प्रथा आहे. ह्यामुळे महिला संपत्तीवरील हक्कापासून वंचित राहतात.

पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये महिलेने लग्नानंतर नवऱ्याच्या घरी जाण्याची प्रथा असल्याने तिच्या माहेरच्या कुटुंबाच्या संपत्तीमध्ये तिचा हक्क मान्य केला जात नाही. त्यामुळे कायद्याने मुलींना समान हक्क दिलेला असूनही प्रत्यक्षात मात्र महिलांना तो मिळताना दिसत नाही. सासरच्या मालमत्तेमध्ये महिलांना बहुतेक वेळा नवऱ्याच्या मृत्यूनंतरच हक्क मिळतो, आणि तो मिळविण्यासाठी देखील महिलांना अनेकदा हिंसाचाराचा सामना करावा लागतो.

समाजातील लिंगभाव आधारित सत्तासंबंधांमध्ये आपोआप बदल घडून येणार नाही, त्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न करावे लागतील. स्त्रियांना संपत्ती आणि संसाधनांवर हक्क मिळणे हा त्यामधील एक महत्वाचा घटक आहे. संपत्तीवरील मालकीला प्रत्यक्ष आणि प्रतिकात्मक अशा दोन्ही पातळ्यांवर महत्व आहे. जमिनीवर मालकी हक्क असल्याचे महिला शेतकऱ्यांना प्रत्यक्ष फायदे तर आहेतच पण कुटुंबातील दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने देखील ते महत्वाचे आहे. घर, जमीन ह्यासारख्या संपत्तीवर अधिकार मिळाल्याने स्त्रीचा कुटुंबातील सन्मान आणि निर्णयप्रक्रियेतील सहभाग वाढेल. तसेच हिंसाचार कमी करण्याच्या आणि महिलांची सुरक्षितता वाढविण्याच्या दृष्टीने देखील हे महत्वाचे आहे.

---

टीप – लिंगभाव हा व्यापक विषय आहे. ह्याठिकाणी स्त्रियांच्या जमिनीवरील हक्कांसाठी काम करत असताना कार्यकर्त्यांना ह्या विषयाची तोंडओळख व्हावी ह्या दृष्टीने काही ठळक मुद्यांची मांडणी केली आहे. तरी अधिक तपशिलात ह्या विषयाची माहिती घेण्यासाठी पुढील संदर्भ वापरता येतील.

१. लिंगभाव आणि पंचायत राज प्रशिक्षण संच – आलोचना स्त्री विषयक संग्रहण व संशोधन केंद्र
२. Understanding Gender - Kamla Bhasin
३. Gender - V Geetha

# हिंदू वारसा हक्क कायदा


महिलांच्या जमिनीवरील हक्कांची मागणी करत असताना, मुळात कायद्याने त्यांना कुटुंबाच्या संपत्तीमध्ये नक्की किती आणि कसा हक्क मिळणार आहे हे माहिती असणे गरजेचे असते. त्यामुळेच त्यासंबंधी कायदे समजून घेणे आवश्यक आहे. कुटुंबांतर्गत संपत्तीचे विभाजन हे वारसा हक्क कायद्यांना धरून होत असते, आणि भारतामध्ये प्रत्येक धर्मासाठी वेगळा वारसा हक्क कायदा आहे. ह्या प्रकरणामध्ये हिंदू वारसा हक्क कायद्याची सोप्या पद्धतीने मांडणी करण्यात आली आहे.

## पार्श्वभूमी

हिंदू वारसा हक्क कायदा सर्वप्रथम १९५६ मध्ये अस्तित्त्वात आला. सन १९९४ मध्ये महाराष्ट्र राज्यात त्यामध्ये सुधारणा करण्यात आली. त्यानंतर सन २००५ मध्ये कायद्यात राष्ट्रीय पातळीवर सुधारणा करण्यात आली. व्यक्तीच्या पश्चात तिच्या संपत्तीचे विभाजन कोणामध्ये आणि कशाप्रकारे होणार ह्या संबंधीचे नियम ह्या कायद्यामध्ये दिलेले आहेत. हा कायदा हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख धर्माच्या लोकांना लागू होतो.

### संपत्तीचे प्रकार

हिंदू कायद्याप्रमाणे संपत्तीचे दोन प्रकार केलेले आहेत – वडिलोपार्जित आणि स्वतंत्र. अशा प्रकारची विभागणी केवळ हिंदू कायद्यामध्ये केलेली आढळते. इतर कायद्यांमध्ये अशा प्रकारची विभागणी केलेली नाही. ह्या दोन्ही संपत्तीच्या वाटपाबद्दलचे नियम वेगळे आहेत. ह्या दोन्ही प्रकारच्या संपत्तीमध्ये नेमका काय फरक आहे ते पाहू.



| वडिलोपार्जित संपत्ती | स्वतंत्र संपत्ती |
|---|---|
| वडिलोपार्जित संपत्ती म्हणजे वडिलांच्या वडिलांचे वडील, वडिलांचे वडिल, वडिल ह्यांच्याकडून व्यक्तीकडे वारसा हक्काने आलेली संपत्ती. | स्वतंत्र संपत्ती म्हणजे वडिलोपार्जित संपत्ती व्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने व्यक्तीकडे आलेली संपत्ती. उदाहरणार्थ स्वतः खरेदी केलेली, आईकडून वारसाने आलेली, वडिलांनी मृत्यूपत्राद्वारे दिलेली, बक्षीस मिळालेली, इतर कोणाही नातेवाईकाकडून वारसाने अथवा मृत्यूपत्राने मिळालेली संपत्ती |
| वडिलोपार्जित संपत्तीमध्ये व्यक्तीला जन्माने हक्क मिळतो. उदाहरणार्थ अ ह्या पुरुषाकडे जी वडिलोपार्जित जमीन आहे, त्यामध्ये त्याच्या मुलांचा हक्क जन्म झाल्या झाल्या तयार होतो. | स्वतंत्र संपत्तीमध्ये अशा प्रकारे जन्माने हक्क मिळत नाही. उदाहरणार्थ अ ह्या पुरुषाने जी स्वतः विकत घेतलेली जमीन आहे, त्यामध्ये त्याच्या मुलांना जन्माने हक्क नाही. त्याच्या हयातीत तो त्या जमिनीचा स्वतंत्र मालक आहे. केवळ त्याच्या मृत्यूनंतर मुलांना त्यामध्ये हक्क मिळेल. |
| जन्माने मुलांना हक्क मिळत असल्याने वडिलोपार्जित संपत्तीचे मृत्युपत्र, बक्षीसपत्र इत्यादी मार्गाने वाटप करण्यावर बंधने आहेत. | स्वतःच्या स्वतंत्र संपत्तीचे हवे तसे वाटप करण्याचा हक्क व्यक्तीला आहे |

### स्त्रिया आणि पुरुष ह्यांच्यासाठी वेगळे नियम

संपत्ती सोडून जाणारी व्यक्ती स्त्री आहे की पुरुष ह्याप्रमाणे वारसाचे नियम बदलतात. हे देखील फक्त हिंदू कायद्यातच आहे.

हे वेगवेगळे नियम काय आहेत, ते कसे बदलत गेले आहेत, आणि त्याचा महिलांच्या हक्कांशी काय संबंध आहे ते थोडक्यात पाहू.

## हिंदू पुरुषाच्या वडिलोपार्जित संपत्तीचे वाटप

वडिलोपार्जित संपत्तीसाठी मिताक्षरा आणि दायबागा अशा दोन विचारपद्धती आहेत. मिताक्षरा पद्धतीमध्ये मुलांना वडिलोपार्जित संपत्तीमध्ये जन्माने हक्क निर्माण होतो. दायभाग पद्धतीमध्ये तसा अधिकार व्यक्तीच्या मृत्यूनंतर वारसांना मिळतो. जन्माने मिळत नाही. भारतात पश्चिम बंगाल सोडून इतर सर्व ठिकाणी मिताक्षरा पद्धती रूढ आहे. महाराष्ट्रात ही पद्धत लागू होत असल्याने ह्याठिकाणी केवळ मिताक्षरा पद्धतीच्या नियमांची चर्चा केली आहे.

### हिंदू वारसा हक्क कायदा, १९५६

पारंपारिक हिंदू कायद्यामध्ये (uncodified Hindu law), मिताक्षर पद्धतीत, वडिलोपार्जित संपत्तीमध्ये केवळ मुलांना सहदायक (coparcener) मानण्यात आले होते. कुटुंबातील मुलींना तो दर्जा देण्यात आलेला नव्हता. त्यामुळे मुलींना जन्माने वडिलोपार्जित संपत्तीमध्ये अधिकार मिळत नव्हता.

१९५६ च्या कायद्याने वडिलोपार्जित संपत्तीच्या बाबतीत काही बदल केले आणि मुलींना वडिलोपार्जित संपत्तीमध्ये अंशतः हिस्सा देण्यात आला (कलम ६). कसा ते उदाहरण घेऊन पाहू.


अ ह्या पुरुषाचा १९७० साली मृत्यू झाला. त्यावेळी त्याच्याकडे विभाजन न झालेली वडिलोपार्जित ९ एकर जमीन होती. त्याच्या पश्चात त्याची पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असे वारस होते. मृत्युच्या वेळी ह्या जमिनीची विभागणी झालेली नव्हती.


आता त्याच्या वारसांमध्ये ९ एकर ची वाटणी कशी होणार?

अ च्या मृत्यूच्या क्षणभर आधी (थोडक्यात तो जिवंत असताना) विभाजन झाले आहे असे गृहीत धरले जाईल व त्या प्रमाणे वाटण्या होतील. ह्या वाटणीचे नियम पारंपारिक हिंदू कायद्याप्रमाणे लागू होतील. (१९५६ च्या कायद्यात ते विभाजन कसे होणार हे नियम दिलेले नाहीत).

ह्या नियमांप्रमाणे अ, अ चा मुलगा आणि अ ची पत्नी ह्यांना प्रत्येकी ३ एकर जमीन मिळेल. अ च्या संपत्तीमध्ये त्याच्या मुलाचा जन्माने अधिकार आहे. तसेच स्त्रीला जेव्हा तिचा नवरा आणि त्याचा मुलगा ह्यांच्यात विभागणी होते तेव्हा मुलाएवढा हिस्सा मिळतो. त्यामुळे ९ एकर जमिनीची वाटणी अशा प्रकारे होईल. ह्यामध्ये अ च्या मुलीला हिस्सा मिळणार नाही. आता अशी वाटणी झाल्यावर अ चा मृत्यू झाला, त्यामुळे त्याच्या वाटणीची ३ एकर जमीन हिंदू वारसा हक्क कायद्यात नमूद केलेल्या वारसांमध्ये समान वाटली जाईल (कलम ८ प्रमाणे). म्हणजे त्याची पत्नी, मुलगा आणि मुलगी ह्यांना प्रत्येकी १ एकर जमीन मिळेल. म्हणजे एकूण जमिनीपैकी पत्नीला ४ एकर, मुलाला ४ एकर, तर मुलीला केवळ १ एकर जमीन मिळेल.

आकृती १ हिंदू वारसा हक्क कायदा, १९५६ प्रमाणे पुरुषाच्या वडिलोपार्जित संपत्तीची वारसांमध्ये विभागणी



अशा प्रकारे १९५६ च्या कायद्याने मुलींना वडिलोपार्जित संपत्तीमध्ये केवळ अंशतः हक्क मिळत होता.

ही परिस्थिती प्रथम १९९४ साली महाराष्ट्र राज्यात केलेल्या सुधारणेने बदलली.

### १९९४ चा महाराष्ट्र हिंदू वारसा हक्क सुधारणा कायदा

१९९४ च्या सुधारणेने मिताक्षर पद्धतीत मुलींना मुलांच्या बरोबरीने वडिलोपार्जित संपत्तीमध्ये सहदायक मानण्यात आले, आणि त्यांना जन्माने अधिकार देण्यात आला. परंतु ह्या सुधारणे मध्ये अशी अट घालण्यात आली होती की अशा प्रकारे हक्क मिळण्यासाठी कायदा लागू झाला त्यावेळी (म्हणजे २२ जून १९९४ रोजी) जर एखाद्या मुलीचा विवाह झाला असेल तर तिला हा हक्क मिळणार नाही.

उदाहरणार्थ – अ चा मृत्यू २००० साली झाला. त्यावेळी त्याची १६ एकर वडिलोपार्जित जमीन होती. त्याच्या मागे त्याची पत्नी, त्याचा मुलगा आणि दोन मुली असे वारस आहेत. त्यापैकी एका मुलीचे लग्न १९९१ साली झाले होते, तर दुसरीचे अजून झालेले नव्हते. तर त्याच्या संपत्तीचे वाटप कसे होईल?

अ च्या मृत्यूच्या क्षणभर आधी (थोडक्यात तो जिवंत असताना) विभाजन झाले आहे असे गृहीत धरले जाईल व त्या प्रमाणे वाटण्या होतील. ह्यामध्ये अ स्वतः, अ चा मुलगा, अ ची मुलगी, आणि अ ची पत्नी ह्यांच्या वाट्याला प्रत्येकी ४

एकर जमीन येईल. ह्यामध्ये विवाहित मुलीला हिस्सा मिळणार नाही. आता अशी वाटणी झाल्यावर अ चा मृत्यू झाला, त्यामुळे त्याच्या वाटणीची ४ एकर जमीन हिंदू वारसा हक्क कायद्यात नमूद केलेल्या वारसांप्रमाणे त्याच्या चार वारसांमध्ये समान वाटली जाईल. अशाप्रकारे मुलगा, पत्नी आणि अविवाहित मुलगी ह्यांना प्रत्येकी ५ एकर तर विवाहित मुलीला केवळ १ एकर जमीन मिळेल.

आकृती २  हिंदू वारसा हक्क महाराष्ट्र सुधारणा कायदा, १९९४ प्रमाणे पुरुषाच्या वडिलोपार्जित संपत्तीची वारसांमध्ये विभागणी

अ (मृत्यू २०००)
(१६ एकर वडिलोपार्जित जमीन)

| पत्नी | मुलगा | मुलगी १ (अविवाहित) | मुलगी २ (विवाहित, १९९१ साली विवाह) |
|---|---|---|---|
| ५ एकर | ५ एकर | ५ एकर | १ एकर |

**२००५ चा राष्ट्रीय पातळीवरील हिंदू वारसा हक्क सुधारणा कायदा**


१९९४ मध्ये महाराष्ट्रात झाली त्याच प्रकारची सुधारणा देशाच्या पातळीवर सन २००५ साली झाली. म्हणजेच मुलींना वडिलोपार्जित जमिनी मध्ये मुलांच्या बरोबरीने जन्माने हक्क मिळाला. ह्यामध्ये केलेला आणखी एक फरक म्हणजे ह्यात मुलीच्या विवाहित असण्याबद्दलच्या तरतुदीचा समावेश नाही.

ह्या कायद्यात केलेला आणखी एक बदल म्हणजे विवाहित मुलीला तिच्या वडिलोपार्जित घरामध्ये राहण्याचा हक्क मिळाला. तसेच १९५६ च्या कायद्याप्रमाणे हिंदू पुरुषाच्या विधवा सून किंवा विधवा नातसून ह्यांनी त्या पुरुषाच्या मृत्यूच्या आधी पुनर्विवाह केल्यास त्या पुरुषाच्या वडिलोपार्जित आणि/किंवा स्वतंत्र संपत्तीमध्ये हिस्सा मिळत नसे. परंतु २००५ च्या कायद्याने हे कलम काढून टाकले. त्यामुळे आता विधवा सुनेने दुसरे लग्न केले तरी तिचा सासऱ्याच्या संपत्ती मधील हक्क अबाधित राहतो.

सध्या २००५ चा सुधारित कायदा देशात लागू आहे.

ह्या कायद्याप्रमाणे संपत्तीचे वाटप कसे होणार ह्याची काही उदाहरणे पाहू.

उदाहरण १ – अ चा मृत्यू २००७ साली झाला. मृत्यूच्या वेळी त्याच्याकडे ९ एकर अविभाजित वडिलोपार्जित जमीन होती. त्याच्यामागे पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असे वारस आहेत. तर त्यांना प्रत्येकी ३ एकर जमीन मिळेल




उदाहरण २ – अचा मृत्यू २०१० साली झाला. मृत्यूच्या वेळी त्याच्याकडे १५ एकर अविभाजित वडिलोपार्जित जमीन होती. त्याच्यामागे पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असे वारस आहेत. तसेच सन २००८ मध्ये त्याचा ब हा मुलगा आणि क ही मुलगी ह्यांचा मृत्यू झाला होता. ब च्या मागे त्याची विधवा पत्नी, आणि एक मुलगी असे वारस आहेत. तर क च्या मागे तिचा विधुर नवरा आणि एक मुलगी हे वारस आहेत.

तर आता अ च्या मृत्यूनंतर त्याच्या संपत्तीची वाटणी कशी होईल?

अ ची विधवा पत्नी, हयात असणारा मुलगा आणि हयात असणारी मुलगी ह्यांना प्रत्येकी ३ एकर जमीन मिळेल. ब च्या वाट्याला ३ एकर जमीन येते. परंतु आता तो हयात नसल्याने त्याची विधवा पत्नी आणि त्याची मुलगी ह्यांच्या वाट्याला प्रत्येकी दीड एकर जमीन येईल. क च्या वाट्याला ३ एकर जमीन येते. तिचा नवरा हा अ च्या संपत्तीमध्ये वारस होत नाही. त्यामुळे क च्या हिश्शाची ३ एकर जमीन तिच्या मुलीला मिळेल.

आकृती ३ हिंदू वारसा हक्क सुधारणा कायदा, २००५ प्रमाणे पुरुषाच्या वडिलोपार्जित संपत्तीची वारसांमध्ये विभागणी




### स्त्रियांच्या हक्काच्या दृष्टीने महत्वाचे

- मुलीला वडिलोपार्जित संपत्तीमध्ये मुलाप्रमाणेच जन्माने समान हिस्सा मिळेल.
- मुलीचा मृत्यू वडिलांच्या आधी झाला असेल तर तिला जो हिस्सा मिळाला असता तो तिच्या मुलांना मिळेल.
- पत्नीला नवऱ्याच्या मृत्यूनंतर मुलांच्या बरोबरीने हिस्सा मिळेल.
- विधवा सुनेला सासऱ्यांच्या संपत्तीमध्ये हिस्सा मिळेल. तिने दुसरा विवाह केला असला तरीही तिचा हा हक्क अबाधित राहिल.
- घटस्फोटीत स्त्रीला नवऱ्याच्या वडिलोपार्जित संपत्तीमध्ये हिस्सा मिळणार नाही. परंतु तिच्या मुलांचा मात्र त्यामध्ये जन्माने हक्क असल्याने त्यांना त्यांचा हिस्सा मिळेल.
- परित्यक्ता स्त्रीला (कायदेशीर घटस्फोट झालेला नसल्यास) तसेच तिच्या मुलांना त्यांचा हिस्सा मिळू शकेल.



**वडिलोपार्जित संपत्तीचे विभाजन**

हिंदू पुरुषाच्या मालमत्तेचे त्याच्या मृत्युच्या पूर्वी विभाजन झाल्यास तो स्वतः, त्याची पत्नी, मुले आणि मुली ह्यांना समान हिस्से मिळतील. हिंदू कायद्याप्रमाणे विभाजन मागण्याचा हक्क फक्त सहदायकांना आहे, लग्नाने कुटुंबात आलेल्या स्त्रियांना तो हक्क नाही, मुले आणि मुली वडिलांकडील वडिलोपार्जित संपत्तीच्या विभागणीसाठी मागणी करू शकतात, पण पत्नीला तो अधिकार नाही. वाटणी झाल्यावर पत्नीला हिस्सा मिळत असला तरी तिला ती वाटणी मागण्याचा अधिकार नाही.


२००५ मध्ये झालेल्या सुधारणेप्रमाणे मुलींना जन्माने हक्क मिळाला असला तरी अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी त्यामध्ये कालमर्यादा घालण्यात आली. २० डिसेंबर २००४ पूर्वी जमिनीचे वाटप झाले असेल तर त्या महिलांना जन्माने हक्क मिळणार नाही असे कायद्यात स्पष्ट करण्यात आले.

**मृत्यूपत्र किंवा इतर प्रकारे वडिलोपार्जित मालमत्तेचे हस्तांतरण**

वडिलोपार्जित संपत्तीच्या हस्तांतरणाचे ठराविक नियम असून त्यामध्ये व्यक्तीला काय करता येईल यावर बंधने आहेत. हिंदू पुरुषाला केवळ त्याच्या वाट्याला येणाऱ्या हिश्शाचे मृत्यूपत्र, बक्षीस पत्र किंवा विक्री इत्यादीद्वारे हस्तांतरण करता येईल. त्याच्या सहदायकांच्या वाट्याच्या संपत्तीबाबत तो तसे करू शकत नाही.

### स्त्रियांच्या हक्काच्या दृष्टीने महत्वाचे

- मुलगी वडिलांच्या वडिलोपार्जित संपत्तीमध्ये वाटणीची मागणी करू शकते.
- पत्नीला नवऱ्याच्या संपत्तीमध्ये तसा हक्क नाही त्यामुळे ती स्वतः वाटणीची मागणी करू शकत नाही. परंतु ती अज्ञान मुलांच्या वतीने वाटणीची मागणी करू शकते, त्यांच्या बरोबरीने तिलाही हिस्सा मिळेल.
- घटस्फोटीत स्त्रीला हिस्सा मिळणार नाही, परंतु परित्यक्ता स्त्री मुलांच्या वतीने वाटणीची मागणी करू शकते.
- विधवा सून वाटणी करून नवऱ्याचा हिस्सा मागू शकते.
- सहदायकांचा हक्क जन्माने असल्याने त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित करता येणार नाही.



## हिंदू पुरुषाच्या स्वतंत्र संपत्तीच्या वारसा बद्दलचे नियम

आधी म्हटल्या प्रमाणे स्वतंत्र संपत्तीमध्ये व्यक्तीने स्वतः विकत घेतलेल्या किंवा तिला वडिलोपार्जित संपत्ती व्यतिरिक्त इतर वारसा हक्कामुळे (उदा आई कडून वारसाने मिळालेली) मिळालेल्या, किंवा बक्षीस पत्राने मिळालेल्या जमिनीचा समावेश होतो. हिंदू वारसा हक्क कायद्याप्रमाणे व्यक्तीला तिने स्वतः कमावलेल्या संपत्तीची हवी तशी वाटणी करण्याचा पूर्ण अधिकार आहे. व्यक्ती मृत्यूपत्राद्वारे आपली अशी संपत्ती कोणाच्याही नावावर करू शकते.

उदाहरणार्थ – अ ने स्वतः विकत घेतलेली ३ एकर जमीन आहे. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या मागे पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे. त्याने मृत्युपत्रात ही ३ एकर जमीन पत्नीच्या नावे केली. तर ती पत्नीलाच मिळेल, मुलांना त्यामध्ये हिस्सा मिळणार नाही.


पण अ ह्या हिंदू पुरुषाने जर मृत्यूपत्र केले नसेल तर मात्र ह्या जमिनीला हिंदू वारसा हक्क कायद्यातील स्वतंत्र संपत्तीच्या वाटपाबद्दलचे नियम (कलम ८) लागू होतील.

हे नियम काय आहेत ते पाहू.

स्वतंत्र संपत्तीच्या वाटपासाठी हिंदू वारसा हक्क कायद्यामध्ये २ वर्गामध्ये वारसांची विभागणी करण्यात आलेली आहे.

## वर्ग पहिला

आकृती ४ : हिंदू वारसा हक्क कायद्याप्रमाणे पुरुषाच्या स्वतंत्र संपत्तीच्या वाटपासाठी वर्ग १ चे वारस




एखाद्या हिंदू पुरुषाच्या मृत्यूच्या वेळी ह्यापैकी कोणीही वारस अस्तित्वात असतील तर संपत्तीची वाटणी त्यांच्यामध्ये होईल. ही वाटणी करण्यासाठीचे नियम पुढील प्रमाणे आहेत –


१. त्याच्या विधवा पत्नीला एक हिस्सा मिळेल

२. त्याच्या हयात असणाऱ्या मुलांना, मुलींना आणि आईला प्रत्येकी एक हिस्सा मिळेल.

३. प्रत्येक पूर्वमृत मुलाच्या / पूर्वमृत मुलीच्या शाखेतील वारसांमध्ये मिळून एक हिस्सा मिळेल

उदाहरणार्थ – अ च्या मृत्यूच्या वेळी त्याने स्वतः विकत घेतलेली ८ एकर जमीन आहे. त्याच्या मागे त्याची आई, त्याची पत्नी, एक मुलगा असे वारस आहेत. त्याच्या एका मुलीचा मृत्यू त्याच्या मृत्यूपूर्वीच झाला होता. त्याच्या मुलीला एक मुलगा आणि एक मुलगी आहे. अ ने मृत्यूपत्र केलेले नाही. त्याच्या मृत्यूनंतर त्याची आई, त्याची विधवा पत्नी, त्याचा मुलगा, ह्यांना प्रत्येकी २ एकर तर मुलीचा मुलगा आणि मुलीची मुलगी ह्यांना प्रत्येकी १ एकर जमीन मिळेल.

आकृती ५ : हिंदू वारसा हक्क सुधारणा कायदा, २००५ प्रमाणे पुरुषाच्या स्वतंत्र संपत्तीची वारसांमध्ये विभागणी



## वर्ग दुसरा

हिंदू पुरुषाच्या मृत्यूच्या वेळी पहिल्या वर्गातील वारसांपैकी कोणीही अस्तित्वात नसल्यास त्याची संपत्ती दुसऱ्या वर्गातील वारसांकडे जाईल. दुसऱ्या वर्गामध्ये ९ उपवर्ग करण्यात आलेले असून त्यांना प्राधान्यक्रम देण्यात आलेला आहे. म्हणजे पहिल्या उपवर्गातील वारसांना प्रथम प्राधान्य. ते नसल्यास दुसऱ्या वर्गातील वारसांना प्राधान्य अशा प्रकारे. प्रत्येक उपवर्गातील वारसांमध्ये संपत्तीचे वाटप समान पद्धतीने होईल.

दुसऱ्या वर्गातील वारसांमध्ये पुढील वारसांचा समावेश होतो.

१. वडील

२. मुलाच्या मुलीचा मुलगा, भाऊ, बहिण

३. मुलीच्या मुलाचा मुलगा

४. भावाचा मुलगा, बहिणीचा मुलगा, भावाची मुलगी, बहिणीची मुलगी

५. वडिलांचे वडील, वडिलांची आई

६. वडिलांची विधवा पत्नी, भावाची विधवा पत्नी

७. वडिलांचा भाऊ, वडिलांची बहिण

८. आईचे वडील, आईची आई

९. आईचा भाऊ, आईची बहिण

उदाहरणार्थ – अ च्या मृत्युच्या वेळी त्याने स्वतः विकत घेतलेली २ एकर जमीन आहे. अ चा विवाह झालेला नाही, आणि त्याच्या आईचा मृत्यू त्याच्या आधी झाला आहे. अ ने मृत्यूपत्र केलेले नाही. त्याच्या मृत्यूनंतर ती जमीन त्याच्या वडिलांना मिळेल.

## गोत्रज (Agnates) आणि भिन्नगोत्रज (Cognates)

जर हिंदू पुरुषाच्या मृत्यूच्या वेळी पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गातील वारस नसतील तर त्याची संपत्ती प्रथम त्याच्या गोत्रजांकडे व गोत्रज नसतील तर भिन्नगोत्रजांकडे जाईल. व्यवहारामध्ये वर्ग एक आणि वर्ग दोन पैकी कोणीही वारस नाहीत अशी परिस्थिती शक्यतो उद्भवत नाही. त्यामुळे ह्या वर्गातल्या वारसांची ह्याठिकाणी सविस्तर चर्चा केलेली नाही.

### स्त्रियांच्या हक्काच्या दृष्टीने महत्वाचे

- मृत्यूपत्र/ बक्षीसपत्र/ विक्रीद्वारे पुरुषाने त्याच्या स्वतंत्र संपत्तीचे हस्तांतरण केल्यास पत्नी आणि मुलीला हिस्सा मिळू शकणार नाही
- मृत्यूपत्र केले नसल्यास आई, पत्नी, मुलगी ह्यांना संपत्तीमध्ये समान हिस्सा मिळेल
- हिंदू पुरुष जिवंत असताना त्याच्या संपत्तीमधील हिस्सा पत्नीच्या/ मुलीच्या नावाने करायचा असल्यास तसे बक्षीसपत्र करून करता येऊ शकेल

## हिंदू स्त्रीच्या संपत्तीच्या वारसासंबंधीचे नियम

हिंदू पुरुषाप्रमाणेच हिंदू स्त्रीला तिच्या स्वतंत्र संपत्तीचे वाटप हवे तसे करण्याचा हक्क आहे. परंतु तिच्या वारसाबद्दलचे नियम मात्र वेगळे आहेत. स्त्रीला वारसाने मिळालेल्या संपत्तीचे वाटप होताना तिला मुले आहेत की नाही, आणि ती संपत्ती तिला कोठून मिळाली हे महत्वाचे ठरते (कलम १५ आणि १६).

मृत्युपत्र न करता स्त्रीचा मृत्यु झाला असल्यास

१. मुलगा, मुलगी, मुलं नसल्यास नातवंड, नवरा

२. नवऱ्याचे वारस

३. आई आणि वडील

४. वडिलांचे वारस

५. आईचे वारस

परंतु स्त्रीला जर मुले किंवा नातवंडे नसतील तर तिला आई–वडिलांकडून मिळालेली संपत्ती तिच्या वडिलांच्या वारसांना मिळेल. त्याच पद्धतीने अशावेळी तिला तिचा नवरा किंवा सासऱ्याकडून मिळालेली संपत्ती तिच्या नवऱ्याच्या वारसांना मिळेल.

ह्या संबंधीची काही उदाहरणे पाहू.

उदाहरण १ – अ च्या मृत्यूच्या वेळी तिची स्वतः विकत घेतलेली ६ एकर जमीन आहे. तिच्या मागे नवरा, एक मुलगा आणि एक मुलगी असे वारस आहेत. तिने मृत्युपत्र केलेले नाही. तिच्या मृत्यूनंतर तिचा नवरा, मुलगा आणि मुलगी ह्यांना प्रत्येकी २ एकर जमीन मिळेल.

उदाहरण २ – अ च्या मृत्यूच्या वेळी तिच्याकडे वडिलांकडून वारसाने आलेली ६ एकर जमीन आहे. तिच्या मागे नवरा आणि एक मुलगी असे वारस आहेत. तिने मृत्युपत्र केलेले नाही. तिच्या ब या मुलाचा मृत्यू तिच्या आधीच झाला होता. ब च्या मागे त्याची पत्नी आणि एक मुलगी आहे. अ च्या मृत्यू नंतर तिचा नवरा आणि मुलगी ह्यांना प्रत्येकी २ एकर जमीन मिळेल. ब च्या वाट्याची २ एकर जमीन त्याच्या मुलीला मिळेल. अ च्या विधवा सुनेला जमीन मिळणार नाही.

उदाहरण ३ – अ च्या मृत्यूच्या वेळी तिच्याकडे स्वतः विकत घेतलेली ४ एकर जमीन आहे. तिचा नवरा तिच्या आधी गेला आहे, आणि तिला मुले नाहीत. तिने मृत्युपत्र केलेले नाही. अशा वेळी तिची जमीन नवऱ्याच्या वारसांना, म्हणजेच नवऱ्याची आई, आई जिवंत नसल्यास नवऱ्याचे वडील, ते ही जिवंत नसल्यास नवऱ्याचे भाऊ आणि बहिण ह्यांच्याकडे जाईल.

उदाहरण ४ – अ च्या मृत्यूच्या वेळी तिने स्वतः विकत घेतलेली २ एकर जमीन आहे. अ चे लग्न झालेले नाही. तिने मृत्यूपत्र केलेले नाही. तिचे आई–वडील जिवंत असल्यास त्यांना प्रत्येकी एक एकर जमीन मिळेल. आई वडील जिवंत नसल्यास वडिलांच्या वारसांकडे जाईल (ह्यात तिचे भाऊ, बहीण ह्यांच्या बरोबर तिच्या वडिलांच्या दुसऱ्या लग्नापासून असलेल्या वारसांचाही समावेश होतो).

उदाहरण ५ – अ ला तिच्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर वारसाने २ एकर जमीन मिळाली. कालांतराने तिने दुसरे लग्न केले. तिला मुले नाहीत. तिच्या मृत्यूच्या वेळी तिचा दुसरा नवरा हयात आहे. तिने मृत्युपत्र केलेले नाही. अशा वेळी तिला मुले नसल्याने तिच्या पहिल्या नवऱ्याकडून तिला मिळालेली जमीन तिच्या दुसऱ्या नवऱ्याला मिळणार नाही तर ती तिच्या पहिल्या नवऱ्याच्या वारसांना मिळेल.

## थोडक्यात महत्वाचे

आपल्याकडे येणाऱ्या महिलांच्या संपत्तीवरील हक्काच्या केसेस हाताळत असताना पुढील गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे आहे

- महिलेला कोणत्या संपत्तीमध्ये हिस्सा मागायचा आहे हे महत्वाचे आहे. तिच्या वडिलांच्या वडिलोपार्जित संपत्तीमध्ये तिला जन्माने हक्क मिळतो, परंतु तिच्या नवऱ्याच्या/ सासऱ्यांच्या संपत्तीमध्ये ती सहदायक नसल्याने तिथे तिचा अधिकार मिळवत असताना इतर गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील. जसे की तिला स्वतःला वाटणी मागण्याचा अधिकार नसला तरी ती अज्ञान मुले असल्यास त्यांच्या वतीने वाटणीची मागणी करू शकते. त्यावेळी तिचा स्वतःचा हिस्साही तिला मिळतो.
- ज्या संपत्तीमध्ये हिस्सा मिळवायचा आहे ती कोणत्या प्रकारची आहे हे महत्वाचे आहे. ती वडिलोपार्जित असेल तर त्यामध्ये हिस्सा मागता येईल, परंतु ती जर स्वतंत्र संपत्ती असेल तर ती ज्या व्यक्तीची आहे, तिला त्या संपत्तीचे हवे तसे वाटप करण्याचा हक्क आहे
- ज्या व्यक्तीच्या संपत्तीमध्ये हिस्सा मागायचा आहे (वडील/ नवरा/ सासरा) त्या व्यक्तीचा मृत्यू कधी झाला हे महत्वाचे ठरेल. १९५६ ते १९९४ मध्ये जर मृत्यू झाला असेल तर १९५६ च्या वारसा हक्क कायद्याचे नियम लागू होतील. १९९४ ते २००५ मध्ये मृत्यू झाला असेल तर महाराष्ट्र सुधारणेचे नियम लागू होतील आणि २००५ नंतर मृत्यू झाला असेल तर राष्ट्रीय सुधारणेचे नियम लागू होतील.

वर दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने काही उदाहरणे घेऊन हिंदू वारसा हक्क कायद्याच्या दृष्टीने ह्या उदाहरणांमध्ये महिलेला कशाप्रकारे हक्क मिळवता येईल ह्याबद्दल मांडणी केलेली आहे.

## हिंदू वारसा हक्क कायद्याशी संबंधित काही उदाहरणे

### केस स्टडी १

शांताबाईंच्या वडिलांची १ एकर जमीन आहे. त्यांच्या वडिलांचा २०१५ मध्ये मृत्यू झाला. त्यांनी मृत्यूपत्र केले नव्हते. शांताबाईंची आई आणि भाऊ हयात आहेत. वडिलांच्या जमिनीत आपला अधिकार शांताबाईंना मिळवायचा आहे.

- त्यांना वडिलांच्या जमिनीत अधिकार आहे का?
- किती जमीन त्यांना मिळेल?
- त्यांना जमीन मिळविण्यासाठी काय अडचणी येतील?
- त्यांना त्यासाठी काय कारवाई करावी लागेल?
- जमीन मिळाल्यास त्यांना त्या जमिनीचे काय व्यवहार करता येतील

**स्पष्टीकरण**

वडिलांची जमीन वडिलोपार्जित आहे का स्वतंत्र हे इथे दिलेले नाही. ती जर वडिलोपार्जित असेल तर २००५ च्या सुधारणा कायद्यामुळे शांताबाईंना जमिनीत हक्क आहे. ती जरी स्वतंत्र असेल तरी त्यांनी मृत्यूपत्र केलेले नसल्याने शांताबाई, आई, आणि भाऊ ह्यांना समान हिस्से मिळतील. तुकडाबंदी कायद्यामुळे जमिनीचे तुकडे होऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या समोर पुढील पर्याय आहेत – आपापसात ठरवून घेऊन प्रत्येकाने आपल्या वाट्याएवढी जमीन कसणे, एकत्रित लागवड करून त्याचा नफा वाटून घेणे, तिघांतील एका व्यक्तीने इतर दोघांना मोबदला देऊन त्यांचा हक्क विकत घेणे, जमिनीची विक्री करून येणारी रक्कम तिघांत वाटून घेणे. ह्यापैकी कोणताच पर्याय यशस्वी न झाल्यास कोर्टात गेल्यास कोर्ट जमिनीचा लिलाव करून येणारी रक्कम तिघांत वाटून घेण्याचा निर्णय देईल.

**केस स्टडी २**

रंजनाच्या नवऱ्याने कर्जाच्या बोज्यामुळे आत्महत्या केली. एकत्र कुटुंबाची ५ एकर जमीन आहे. रंजनाला दोन लहान मुलं आहेत. तिचे सासू सासरे तिने घरातून निघून जावे ह्यासाठी तिच्यावर दबाव आणत आहेत.

- तिला तिच्या नवऱ्याच्या कुटुंबाच्या जमिनीमध्ये हिस्सा मिळू शकतो का?
- किती मिळू शकतो?
- तो मिळविण्यासाठी तिला काय करावे लागेल? तुम्ही कशी मदत कराल

**स्पष्टीकरण**

ह्याठिकाणी रंजनाच्या नवऱ्याच्या मृत्यूचे साल दिलेले नाही. सर्वात आधी ते विचारात घ्यावे लागेल. तसेच तिला २ मुलं आहेत एवढे म्हटले आहे. त्यात मुलगी आहे का हे विचारात घ्यावे लागेल. ह्या दोन गोष्टींच्या आधारे तिच्या मुलांना किती हिस्सा मिळणार हे ठरेल. तसेच ही जमीन तिच्या सासऱ्यांची स्वतंत्र आहे का वडिलोपार्जित हे विचारावे लागेल. स्वतंत्र असेल तर तिला हक्क मागता येणार नाही. वडिलोपार्जित असेल तर रंजना नवऱ्याच्या हिश्यासाठी वाटणीची मागणी करू शकते. तिच्या नवऱ्याचा हिस्सा किती हे त्याला भाऊ-बहिण आहेत का ह्यावरून ठरेल. आणि त्याचा जो हिस्सा असेल तो रंजना आणि तिच्या मुलांच्यात वाटला जाईल.

**केस स्टडी ३**

रमाच्या नवऱ्याने तिला जमिनीमध्ये हक्क मिळावा ह्यासाठी आपल्या जमिनीमध्ये सहहिस्सेदार म्हणून तिच्या नावाची नोंद सात बाराच्या उताऱ्यावर करून दिली.

- रमाला जमिनीवर हक्क मिळाला का?
- असल्यास का?
- नसल्यास का नाही? आणि काय पद्धतीने हे करायला हवे होते?
- रमाचा नवरा तिच्या संमती शिवाय जमीन विकू शकतो का?

**स्पष्टीकरण**

लक्ष्मी मुक्ती परिपत्रकामध्ये अशा प्रकारे पत्नीला सहहिस्सेदार करून घेण्याची तरतूद आहे. परंतू तसे करत असताना आधी जमीन कोणत्या प्रकारची आहे हे पहावे लागेल. जर ती वडिलोपार्जित असेल, आणि त्यांना मुले असतील, तर त्या मुलांचा त्या जमिनीत जन्माने हक्क आहे. त्यामुळे रमाच्या नवऱ्याला असे करता येणार नाही. वाटण्या करून त्याच्या वाट्याला जी जमीन येईल केवळ तेवढ्या हिश्शाच्या जमिनीचे व्यवहार तो करू शकतो.

**केस स्टडी ४**

लक्ष्मी तिच्या नवऱ्याचे घर सोडून आई-वडिलांच्या घरी आली. तिच्या वडिलांची २० एकर जमीन आहे आणि घर आहे. वडील गेल्या नंतर तिने घरातून बाहेर पडावे ह्यासाठी तिचा भाऊ प्रयत्न करतो आहे. तुझ्या लग्नात आम्ही भरपूर खर्च केला आणि त्यामुळे आता तुला जमिनीत हिस्सा देणार नाही असे तो म्हणतो. तसेच आता तिचे लग्न झालेले असल्याने तिला ह्या घरात राहण्याचा हक्क नाही असे त्याचे म्हणणे आहे.

- लग्नात केलेल्या खर्चाच्या बदल्यात भाऊ लक्ष्मीची जमीन मागू शकतो का?
- त्या घरात राहण्याचा तिला हक्क आहे का?
- घरावर हक्क असेल तर मिळविण्यासाठी तिला काय करावे लागेल?
- जमिनीमध्ये हक्क मिळविण्यासाठी तिला काय करावे लागेल?

**स्पष्टीकरण**

ह्याठिकाणी जमीन वडिलोपार्जित आहे का स्वतंत्र ह्याचा उल्लेख नाही. ती जर स्वतंत्र असेल आणि वडिलांनी मृत्यूपत्र केले असेल तर त्यानुसार वाटण्या होतील. मृत्यूपत्र केले नसेल तर तिला हक्क मिळेलच. परंतु ती वडिलोपार्जित असेल तर लक्ष्मीला त्यात जन्माने हक्क आहे. तो कीती मिळेल हे पाहण्यासाठी सर्वात आधी वडिलांचा मृत्यू कधी झाला हे पहावे लागेल. १९९४ पूर्वी झाला असेल तर तिला अंशतः हक्क मिळेल. १९९४ ते २००५ च्या मधे झाला असेल तर तिचे लग्न कधी झाले हा मुद्दा महत्वाचा ठरेल. ते १९९४ पूर्वी झाले असेल तर तिला अंशतः हिस्सा मिळेल, पण नंतर झाले असेल तर तिला भावाच्या समान हिस्सा मिळेल. २००५ नंतर वडिलांचा मृत्यू झाला असेल तर तिचे लग्न कधी झाले होते ह्याने फरक पडत नाही. तसेच २००५ च्या कायद्याने त्या घरात राहण्याचा तिला पूर्ण हक्क आहे.

**केस स्टडी ५**

मालन आणि शालन च्या वडिलांची वडिलोपार्जित ४ एकर जमीन आहे. त्यांना भाऊ नाही. वडिलांनी मृत्यूपत्र करून जमीन भावाच्या मुलाच्या नावावर केली. मालन चे वडील गेल्यावर आता त्यांचा चुलतभाऊ जमीन कसत आहे आणि मालन आणि शालनला तो ती जमीन देत नाही.

- मालन चे वडील कायद्याने असे करू शकतात का?
- असल्यास का?
- नसल्यास का नाही?
- मालन आणि तिच्या बहिणीला जमीन मिळवायची असल्यास त्यांना काय करावे लागेल?

**स्पष्टीकरण**

सर्वात प्रथम वडिलांचा मृत्यू कधी झाला हे पहावे लागेल. १९९४ चा सुधारणा कायदा येण्यापूर्वी जर त्यांचा मृत्यू झाला असेल तर हिंदू कायद्याप्रमाणे त्यांना मुलगा नसल्यामुळे ते त्यांच्या जमिनीचे sole surviving coparcener झाले, आणि त्यामुळे ती त्यांची स्वतंत्र जमीन समजली जाणार आणि त्या जमिनीचे मृत्यूपत्राद्वारे वाटप करण्याचा त्यांना पूर्ण हक्क आहे.

जर १९९४ चा सुधारणा कायदा लागू झाल्या नंतर त्यांचा मृत्यू झाला असेल तर मालन आणि शालन चे लग्न झाले आहे का आणि कधी झाले आहे हे प्रश्न महत्वाचे ठरतील. जर १९९४ च्या आधी त्या दोघींचे लग्न झाले असेल तर वरील प्रमाणेच परिस्थिती राहील. पण त्यांचे लग्न झाले नसेल किंवा १९९४ नंतर झाले असेल तर मात्र त्या वडिलांच्या संपत्तीमध्ये सहदायक बनतील आणि वडिलांना अशा प्रकारे पूर्ण जमीन देता येणार नाही. ते त्यांच्या हिश्शाची जमीन देऊ शकतात, पण मुलींचा हिस्सा त्यांना मिळेलच.


# मुस्लीम वारसा कायदा

मुस्लीम वारसा कायदा हा एक गुंतागुंतीचा विषय आहे. ह्याठिकाणी त्याची तपशिलात चर्चा करणे शक्य नाही. ह्याठिकाणी कार्यकर्त्यांना उपयुक्त ठरतील अशा कायद्यातील काही महत्वाच्या मुद्यांची ढोबळ मानाने मांडणी केली आहे.

भारतातील मुस्लीम वारसा कायदा हा पारंपारिक, कुराणावर आधारित कायदा आहे. त्याचे संहितीकरण (codification) झालेले नाही. त्यामध्ये वारस कोण आहेत, त्यांचा वाटा किती आहे, तो वाटा कोणत्या परिस्थितीत मिळालेला आहे, आणि विशेष परिस्थितीमध्ये वाटा काय असेल हे नमूद केलेले आहे.

मुहम्मद पैगंबर हे समाजसुधारक होते. त्यांच्या पूर्वी महिलांना संपत्तीमध्ये कोणताही हिस्सा मिळत नसे. त्यांनी सर्वप्रथम वारसांमध्ये महिलांचा समावेश केला आणि महिलांना त्यांच्या बरोबरीच्या पुरुषांच्या १/२ हिस्सा देऊ केला. तसेच मुहम्मद पैगंबरांनी पूर्वज, वंशज ह्यांच्या बरोबरीने काही collateral heirs चा देखील समावेश केला. उदाहरणार्थ त्यांनी पहिल्यांदाच युटेरियन बहिण आणि भाऊ ह्यांचा (एक आई पण दोन वेगळे वडील असणारी भावंडे) समावेश करून त्यांना समान हिस्सा देऊ केला.

मुस्लीम धर्मात असणाऱ्या शिया आणि सुन्नी ह्या दोन पंथांमध्ये वारसा संबंधीची काही तत्त्वे समान आहेत, तर काही तत्त्वे दोन्ही पंथांसाठी वेगळी आहेत. दोन्ही पंथांना लागू होणारी प्राथमिक तत्त्वे बघू.




मुस्लीम कायद्यामध्ये :

- स्थावर आणि जंगम संपत्तीमध्ये फरक करण्यात आलेला नाही
- व्यक्तीला संपत्तीमध्ये जन्माने हक्क मिळत नाही
- व्यक्तीच्या मृत्यूनंतर संपत्तीचे वाटप करत असताना मृत व्यक्ती पुरुष आहे का स्त्री आहे ह्याने फरक पडत नाही. स्त्रिया आणि पुरुष ह्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या संपत्तीच्या वाटपासंदर्भात नियम सारखेच आहेत.
- साधारणपणे पुरुषांना त्यांच्या बरोबरीच्या स्त्रियांच्या दुप्पट हिस्सा मिळेल. उदाहरणार्थ मुलीला १ तर मुलाला २ भाग मिळतील. बहिणीला १ तर भावाला २ भाग मिळतील.
- प्रतिनिधित्वाचे तत्व मान्य केलेले नाही (Doctrine of Representation). उदाहरणार्थ अ ह्या व्यक्तीचा मृत्यू झाला त्यावेळी त्याचा एक मुलगा आणि एका पुवमृत मुलाचा मुलगा असे दोघे जिवंत आहेत. तर सर्व संपत्ती ही मुलाला मिळेल. पूर्वमृत मुलाच्या मुलाला, त्याच्या वडिलांचा प्रतिनिधी म्हणून काही मिळणार नाही.

- मृत्यूपत्राने संपत्ती देण्यावर बंधन घातलेले आहे. केवळ १/३ संपत्ती मृत्यूपत्र करून देता येऊ शकते. ही १/३ सुद्धा वारस सोडून इतर कोणालाही देता येऊ शकते. मात्र ती एखाद्या वारसाला द्यायची असेल तर इतर वारसांची मंजुरी आवश्यक आहे.
- अनौरस संततीला वडिलांच्या संपत्तीमध्ये हिस्सा मिळत नाही.
- वडील, आई, पती/पत्नी, मुलगा, मुलगी ह्या पाच प्राथमिक वारसांना नेहमीच हिस्सा मिळतो. त्यांना कधीच वगळले जात नाही.

शिया आणि सुन्नी पंथीयांमध्ये ही तत्त्वे समान आहेत. आता ह्या पंथांमध्ये असणारी वेगवेगळी तत्त्वे बघू.

## सुन्नी कायदा

ह्याठिकाणी कायद्याची अगदी थोडक्यात माहिती दिलेली आहे. व्यवहारात उपयोगी पडेल अशा ठराविक नातेसंबंधांसाठी चे नियम दिलेले आहेत. कायद्यातील इतर अनेक बारकावे – जसे की नियम आणि त्यांचे अपवाद ह्याठिकाणी दिलेले नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

**सुन्नींमध्ये तीन प्रकारचे वारस मानले गेले आहेत**

१. कुराणातील वारस
२. बाकी राहिलेल्या संपत्ती मधील उर्वरित हिस्सेदार (Residuaries)
३. दूरचे नातेवाईक (रक्ताचे नातेसंबंध असणारे परंतु पहिल्या दोन्ही मध्ये नसणारे वारस) (Distant kindred)

कुराणातील वारस हे मुख्य हिस्सेदार (sharers) असून सर्वात प्रथम त्यांना हिस्सा मिळायला हवा. आई, वडील, पती/पत्नी आणि मुलगी ह्यांचा समावेश कुराणातील वारसांमध्ये होतो. बाकी राहिलेल्या संपत्तीमधील उर्वरित हिस्सेदारांचा समावेश वेगळ्या प्राधन्यक्रम यादीमध्ये करण्यात आलेला आहे. मुख्य हिस्सेदारांना वाटा दिल्यानंतरच ह्यांना वाटा मिळतो. पाच प्रमुख नातेसंबंधांपैकी मुलगा हा नेहमीच उर्वरित हिस्सेदार असतो. आणि ज्यावेळी मुलगा आणि मुलगी असे दोघेही असतील, त्यावेळी मुलगी देखील मुख्य हिस्सेदार न राहता उर्वरित हिस्सेदार होते.

१. मृत व्यक्तीच्या मागे जेव्हा मुलगा आणि/ किंवा मुलगी किंवा मुलाची मुले (मुलगा आणि/ किंवा मुलगी) (कितीही पिढ्या खाली पर्यंत) असतील त्यावेळी वडिलांना १/६ हिस्सा मिळेल. मुले नसल्यास मुख्य हिस्सेदारांना देऊन उरलेली संपत्ती त्यांना मिळेल. (व्यक्तीच्या मृत्युनंतर व्यक्तीला मुले नसल्यास हिस्सेदार वारसांना प्रथम संपत्ती दिली जाईल. बाकी राहिलेली संपत्ती वडिलांना दिली जाईल.)

२. मृत व्यक्तीच्या मागे जेव्हा मुलगा आणि/ किंवा मुलगी किंवा मुलाची मुले (कितीही पिढ्या खाली पर्यंत) असतील त्यावेळी आईला १/६ हिस्सा मिळेल. (मुले नसल्यास तिला १/३ संपत्ती मिळेल)

३. मृत पुरुषाच्या मागे जेव्हा मुलगा आणि/ किंवा मुलगी किंवा मुलाची मुले (कितीही पिढ्या खाली पर्यंत) असतील त्यावेळी पत्नीला १/८ हिस्सा मिळेल. (मुले नसल्यास तिला १/४ संपत्ती मिळेल)

४. मृत स्त्रीच्या मागे जेव्हा मुलगा आणि/ किंवा मुलगी किंवा मुलाची मुले (कितीही पिढ्या खाली पर्यंत) असतील त्यावेळी पतीला १/४ हिस्सा मिळेल. (मुले नसल्यास त्याला १/२ संपत्ती मिळेल)

५. मृत व्यक्तीला मुलगा नसेल तर मुलगी हिस्सेदार होईल आणि तिला १/२ हिस्सा मिळेल. जर एकापेक्षा जास्त मुली असतील तर त्यांच्यात मिळून २/३ हिस्सा मिळेल. जर मृत व्यक्तीला मुलगा आणि मुलगी दोघेही असतील तर मुलगी मुलाबरोबर बाकी राहिलेल्या संपत्तीमध्ये हिस्सा घेईल. आणि त्याच्या आर्धा हिस्सा तिला मिळेल.

६. मुलगा हा नेहमीच बाकी राहिलेल्या संपत्तीमध्ये हिस्सा घेईल.

**उदाहरण १**

एका सुन्नी पुरुषाच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी, मुलगा, मुलगी, आई आणि वडील असे वारस आहेत. त्याच्याकडे २४ एकर जमीन होती. आई, वडील आणि पत्नी ह्या तीन मुख्य हिस्सेदारांना पुढील प्रमाणे हिस्से मिळतील

वडील – संपत्तीमधील १/६ = ४ एकर
आई – संपत्तीमधील १/६ = ४ एकर
पत्नी – संपत्तीमधील १/८ = ३ एकर
मुख्य वारसांना देऊन उरलेली जमीन = १३ एकर

त्याला मुलगा आणि मुलगी दोघेही असल्याने त्यांना उर्वरित संपत्तीमधील हिस्सा मिळेल, आणि मुलीचा हिस्सा मुलाच्या आर्धा असेल. त्यामुळे त्यांना मिळणारे हिस्से पुढीलप्रमाणे असतील.

मुलगा – ८.६६ एकर
मुलगी – ४.३४ एकर

**उदाहरण २**

एका सुन्नी स्त्री चा मृत्यू झाला त्यावेळी तिच्या मागे नवरा, मुलगा, मुलगी, वडील आणि आई हे वारस होते. तिच्याकडे २४ एकर जमीन होती.

आई, वडील आणि पती ह्या तीन मुख्य हिस्सेदारांना पुढीलप्रमाणे हिस्से मिळतील

वडील – संपत्तीमधील १/६ = ४ एकर
आई – संपत्तीमधील १/६ = ४ एकर
पती – संपत्तीमधील १/४ = ६ एकर
मुख्य वारसांना देऊन उरलेली जमीन = १० एकर

त्याला मुलगा आणि मुलगी दोघेही असल्याने ते त्यांना उर्वरित संपत्तीमधील हिस्सा मिळेल, आणि मुलीचा हिस्सा मुलाच्या आर्धा असेल. त्यामुळे त्यांना मिळणारे हिस्से पुढीलप्रमाणे असतील.

मुलगा – ६.६६ एकर
मुलगी – ३.३४ एकर

**उदाहरण ३**

एका सुन्नी पुरुषाच्या मृत्यूनंतर त्याचे आई, वडील, २ मुली आणि विधवा सून असे वारस आहेत. त्याच्याकडे ६ एकर जमीन होती.

आई आणि वडील ह्या दोन मुख्य हिस्सेदारांना पुढीलप्रमाणे हिस्से मिळतील

वडील – संपत्तीमधील १/६ = १ एकर
आई – संपत्तीमधील १/६ = १ एकर

मुलगा नसल्याने दोन मुलींच्यात मिळून २/३ हिस्सा मिळेल. दोघींच्यात मिळून ४ एकर जमीन असल्याने त्याचे वाटे पुढीलप्रमाणे होतील.

मुलगी १ = २ एकर
मुलगी २ = २ एकर
विधवा सुनेला मात्र हिस्सा मिळणार नाही.

## शिया कायदा

शिया कायद्याप्रमाणे वारसांची विभागणी २ गटांमध्ये केली जाते.

१. रक्ताच्या नात्याने निर्माण होणारे वारस
२. लग्नाने निर्माण होणारे वारस (पती आणि पत्नी)

रक्ताच्या नात्याच्या वारसांची विभागणी तीन वर्गांमध्ये केली आहे आणि प्रत्येक वर्गामध्ये दोन उपवर्ग केले आहेत. प्रत्येक वर्गातील वारस हे एकाच वेळेला हिस्सा घेतील. जेव्हा एका वर्गातील वारस नसतील त्याच वेळी पुढील वर्गातील वारसांना हिस्सा मिळेल.

वर्ग १ (अ) आई–वडील
(ब) मुले आणि इतर वंशज

वर्ग २ (अ) आजी – आजोबा
(ब) भाऊ, बहिण आणि त्यांचे वंशज

वर्ग ३ (अ) वडिलांचे भाऊ आणि बहिण
(ब) आईचे भाऊ आणि बहिण

**शिया कायद्याप्रमाणे संपत्तीचे विभाजन**

१. मृत व्यक्तीच्या मागे जेव्हा वंशज (मुले, नातवंडे, पतवंडे) असतील त्यावेळी वडिलांना १/६ हिस्सा मिळेल. (वंशज नसल्यास हिस्सेदारांना देऊन उरलेली संपत्ती त्यांना मिळेल)

२. मृत व्यक्तीच्या मागे जेव्हा वंशज असतील त्यावेळी आईला १/६ हिस्सा मिळेल. (वंशज नसल्यास तिला १/३ संपत्ती मिळेल)

३. मृत पुरुषाच्या मागे जेव्हा वंशज असतील त्यावेळी पत्नीला १/८ हिस्सा मिळेल. (वंशज नसल्यास तिला १/४ संपत्ती मिळेल)

४. मृत स्त्रीच्या मागे जेव्हा वंशज असतील त्यावेळी पतीला १/४ हिस्सा मिळेल. (वंशज नसल्यास त्याला १/२ संपत्ती मिळेल)

५. मुलगा नसेल तर मुलीला १/२ हिस्सा मिळेल. जर एकापेक्षा जास्त मुली असतील तर त्यांच्यात मिळून २/३ हिस्सा मिळेल. जर मुलगा असेल तर त्याच्या बरोबरीने मुलगी बाकी राहिलेल्या संपत्ती मध्ये हिस्सा घेईल, आणि त्याच्या आर्धा हिस्सा तिला मिळेल.

६. मुलगा का नेहमीच बाकी राहिलेल्या संपत्ती मध्ये हिस्सा घेईल.

सुन्नी आणि शिया पंथांमधील एक फरक म्हणजे सुन्नींमध्ये आई, वडील, पत्नी/पती, हे त्यांचा ठरलेला हिस्सा मुलगा आणि/किंवा मुलगी, मुलाची मुलं किंवा मुलाची नातवंड किंवा मुलाची पतवंडे असताना घेतात. सुन्नींमध्ये मुलींची मुले, मुलीची नातवंडे, मुलीची पतवंडे असतील तरी फरक पडत नाही. शियांमध्ये मात्र तसे नाही.

**उदाहरण**

एका शिया पुरुषाच्या मृत्यू नंतर त्याचे आई वडील, दोन मुली, आणि एक भाऊ असे वारस आहेत. त्याच्याकडे ६ एकर जमीन होती.

आई आणि वडील ह्या दोन मुख्य हिस्सेदारांना पुढीलप्रमाणे हिस्से मिळतील

वडील – संपत्तीमधील १/६ = १ एकर
आई – संपत्तीमधील १/६ = १ एकर

मुलगा नसल्याने दोन मुलींच्यात मिळून २/३ हिस्सा मिळेल. दोघींच्यात मिळून ४ एकर जमीन असल्याने त्याचे वाटे पुढीलप्रमाणे होतील.

मुलगी १ = २ एकर
मुलगी २ = २ एकर

भाऊ हा वर्ग दोन मधील वारस आहे, आणि वर्ग एक मधील वारस अस्तित्त्वात असल्याने भावाला मात्र हिस्सा मिळणार नाही.

## महिलांच्या दृष्टीने महत्वाचे

- आई ही नेहमीच मुलांच्या संपत्तीमध्ये वारस असते.
- मुलगी ही नेहमीच आई–वडिलांच्या संपत्तीमध्ये वारस असते.
- पत्नीला पतीच्या संपत्तीमध्ये हिस्सा मिळतो.
- मृत व्यक्तीला मुले किंवा वडील नसतील तर बहिणीला संपत्तीमध्ये हिस्सा मिळेल.
- विधवा सुनेला मात्र सासू किंवा सासऱ्यांच्या संपत्तीमध्ये हिस्सा मिळू शकत नाही.
- साधारणपणे स्त्रियांना त्यांच्या बरोबरीच्या पुरुषांच्या निम्मा हिस्सा मिळेल. उदाहरणार्थ मुलीला १ तर मुलाला २ भाग मिळतील. बहिणीला १ तर भावाला २ भाग मिळतील.



आधी म्हटल्याप्रमाणे ह्याठिकाणी केवळ मुस्लीम कायद्यामधील काही ठराविक मुद्यांची मांडणी केली आहे. मुस्लीम कायद्याची तपशिलात मांडणी हा एक स्वतंत्रपणे लिखाण करण्याचा विषय आहे. ह्याठिकाणी दिलेली माहिती समग्र नाही ह्याची कृपया नोंद घ्यावी.

# जमीन हस्तांतरणाचा कायदा आणि महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम


संपत्ती मिळविण्याचे दोन मार्ग आहेत – वारसा हक्काने, आणि मालमत्तेच्या हस्तांतरणाद्वारे. त्यामुळे महिलांच्या संपत्तीवरील हक्कांचा विचार करत असताना वारसा हक्क कायद्यांबरोबरच इतर कोणत्या प्रकारे महिलांना मालमत्ता मिळू शकते किंवा त्यांच्या कडून घेतली जाऊ शकते, हे समजून घेण्यासाठी मालमत्तेच्या हस्तांतरणाचे इतर प्रकार लक्षात घेणे गरजेचे आहे. तसेच ह्या सर्व प्रक्रियांममध्ये नोंदणी करण्या बाबतचे काय नियम आहेत आणि त्यासाठी किती खर्च येऊ शकतो हे समजून घेण्यासाठी मुद्रांक शुल्काच्या कायद्याची माहिती घेणेही गरजेचे आहे.

मालमत्ता हस्तांतरणाच्या कायद्यामधील तरतुदींकडे जाण्यापूर्वी वारसा हक्कांशी संबंधित दोन महत्वाच्या दस्तांची माहिती घेऊ.

### वाटपपत्र

वडिलोपार्जित मालमत्तेची वारसांमध्ये विभागणी करण्यासाठी वाटपपत्र केले जाते. अनेकदा कुटुंबात आपापसात समजुतीने मालमत्तेची वाटणी केली जाते. परंतु कायदेशीर हक्क प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने मुद्रांक शुल्क भरून, वाटपपत्राची नोंदणी करून घेणे हितावह आहे. खास करून महिलांचा हक्क प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने हे महत्वाचे आहे. शेतजमिनीच्या वाटपपत्रासाठी केवळ १०० रु मुद्रांक शुल्क लागू होते. तसेच त्याच्या नोंदणीसाठी नोंदणी शुल्क हे मिळकतीच्या १% किंवा रु तीस हजार ह्या दोन्हीपैकी कमी किंमत एवढे असेल. वाटपपत्र जर शेतजमीन सोडून इतर मालमत्तेचे करायचे असेल तर मुद्रांक शुल्क मिळकतीच्या बाजारभावाच्या २% आणि नोंदणी शुल्क १% एवढे असेल.

### हक्कसोडपत्र




वडिलोपार्जित संपत्ती मधील एक सहदायक आपला हक्क सोडून जर तो दुसऱ्या सहदायकाला देत असेल, तर त्यावेळी हक्कसोडपत्र केले जाते. ज्यावेळी वडिलोपार्जित संपत्ती सर्व सहदायकांमध्ये संयुक्तपणे असेल त्यावेळीच हक्कसोडपत्र होऊ शकते. एकदा मालमत्तेच्या वाटण्या होऊन सहदायकांना स्वतंत्र हिस्से मिळाले की त्यापैकी एका सहदायकाला दुसऱ्याच्या नावाने आपला हिस्सा द्यायचा असेल तर त्यासाठी बक्षीसपत्र/ खरेदीखत करावे लागेल. २०० रु मुद्रांकशुल्क भरून हक्कसोडपत्र करता येऊ शकते.

आपल्याकडे मोठ्या प्रमाणात वडिलोपार्जित संपत्तीमधील हिस्सा सोडून देण्यासाठी महिलांकडून हक्कसोड पत्र करून घेतले जाते. हे होऊ नये ह्यासाठी महिला तसेच त्यांचे कुटुंबीय ह्यांच्याबरोबर संवाद साधणे आवश्यक आहे.

मालमत्ता हस्तांतरणाच्या कायद्यामध्ये (१८८२) मालमत्ता हस्तांतरीत करण्याच्या ज्या वेगवेगळ्या पद्धती आहेत त्याबद्दलची थोडक्यात मांडणी ह्याठिकाणी केलेली आहे. तसेच महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८) मध्ये अशाप्रकारे मालमत्तेचे व्यवहार करत असताना, त्याची नोंदणी करण्यासाठी किती नोंदणी शुल्क लागेल, दस्त किती दिवसांत नोंदणी केला गेला पाहिजे इत्यादी संबंधीचे नियम दिलेले आहेत. ह्या दोन कायद्यांमधील कलमांच्या आधारे काही ठळक महत्वाच्या मुद्यांची मांडणी ह्याठिकाणी केलेली आहे[१]. ह्या ठिकाणी ज्या मुद्यांची मांडणी केली आहे, त्याव्यतिरिक्तही ह्या कायद्यामध्ये इतर अनेक गोष्टी सांगितलेल्या आहेत. परंतु त्या सर्व तपशिलात न जाता ह्याठिकाणी केवळ महिलांच्या हक्कांच्या दृष्टीने काही महत्वाच्या बाबींची मांडणी केली आहे.

## खरेदी–विक्री

स्थावर किंवा जंगम अशा दोन्ही मालमत्तांचे हस्तांतरण खरेदी–विक्री द्वारे करता येते. ज्या मालमत्तेची किंमत १०० रु पेक्षा जास्त आहे त्या जमिनीचे खरेदी खत रजिस्टर दस्तानेच व्हायला हवे. तसेच फक्त मुद्रांक शुल्क भरून उपयोग नाही, तर त्याची नोंदणी करणे देखील गरजेचे आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच जमिनीवर हक्क प्रस्थापित होऊ शकतो.

खरेदीखताच्या आधी साठेखत केले जाते. साठेखत किंवा विसारपावती ह्यामध्ये जमिनीचा व्यवहार ठरवला आहे एवढेच नमूद केलेले असते. तो एक प्रकारचा करार आहे. ह्या कराराप्रमाणे जर ताबा दिला असेल आणि ताबा घेतलेल्या व्यक्तीने त्यामध्ये काही गोष्टी केल्या, उदाहरणार्थ झाडे लावली, घर बांधलं इत्यादी, तर त्या जमीन घेणाऱ्या व्यक्तीचा हक्क कायम राहतो. अन्यथा साठेखतामधून मिळालेला हक्क हा मालकी हक्क नव्हे. जमीन विकणाऱ्याने जर साठेखत केल्यानंतर जमीन विकण्यास नकार दिला तर जमीन घेणाऱ्याला त्यासाठी कोर्टात जावे लागेल, आणि कोर्टात केस सिद्ध करावी लागेल. कोर्ट त्या जमिनी संदर्भातील निर्णय घेईल. थोडक्यात साठेखताने मिळकतीवरील हक्क निर्माण होत नाही. त्यासाठी खरेदीखत करणे गरजेचे आहे.

खरेदी खताची नोंदणी करत असताना मुद्रांकशुल्क मिळकतीच्या बाजारभावाच्या प्रमाणात द्यावे लागते. ते बाजारभावाच्या किती टक्के आहे हे संबंधित संपत्ती जंगम आहे का स्थावर, तसेच स्थावर असेल तर ती कोणत्या हद्दीत आहे – ग्रामपंचायत, नगर पंचायत, महानगरपालिका – ह्यावर अवलंबून असेल. उदाहरणार्थ पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मिळकतीच्या ५% मुद्रांक शुल्क, तसेच स्थानिक कर १% असे मिळून ६% मुद्रांक शुल्क भरावे लागेल. तसेच खरेदीखताची नोंदणी करण्यासाठीचे नोंदणी शुल्क हे मिळकतीच्या १% किंवा रु तीस हजार ह्या दोन्हीपैकी कमी किंमत एवढे असेल.

## बक्षीस

हा हस्तांतरणाचा दुसरा प्रकार ज्यामध्ये स्थावर किंवा जंगम मालमत्ता एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला बक्षीस (gift) देऊ शकते. कुटुंबांतर्गत महिलांच्या नावाने जमीन हस्तांतरण करण्यासाठी ह्या पद्धतीचा उपयोग होऊ शकतो. बक्षीसपत्र करताना काही नियम समजून घेतले पाहिजेत. स्थावर मिळकतीचे बक्षीसपत्र करायचे असेल तर मिळकतीची किंमत कितीही असली तरी ते रजिस्टर करणे गरजेचे आहे. त्यावर दोन साक्षीदारांच्या सह्या असणे आवश्यक आहे. त्या नसतील तर ते बेकायदेशीर ठरेल. बक्षीसपत्रावर सही करणारे साक्षीदार हे शक्यतो नात्यातील व्यक्ती नसाव्यात. ज्याने बक्षीस घेतले आहे, त्याने ते स्वीकार करणे आवश्यक असते. ही स्वीकारल्याची नोंद बक्षीस देणारी व्यक्ती जिवंत असे पर्यत किंवा मिळकतीचे हस्तांतरण करण्यास सक्षम असे पर्यत करणे गरजेचे आहे. तोवर हे न केल्यास नंतर हे बक्षीसपत्र बेकायदेशीर ठरू शकते. त्यामुळे बक्षीसपत्र करताना त्याच दिवशी ते स्वीकारल्याचे, त्याच दस्तामध्ये नमूद करून बक्षीस घेणाऱ्या व्यक्तीने सही करावी. जेणे करून नंतर प्रश्न उपस्थित होऊ नये.

---

१. मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क किती असेल ह्यासंबंधीचे नियम बदलत राहतात. ह्यामध्ये नमूद केलेल्या रकमा ह्या प्रशिक्षण संच बनवत असताना लागू असलेल्या नियमांना धरून दिल्या आहेत. त्यामध्ये पुढील काळात बदल होऊ शकतो ह्याची कृपया नोंद घ्यावी.

बक्षीसपत्र करत असताना ते कोणाच्या नावाने केले जात आहे ह्यावरून त्यासाठी किती मुद्रांक शुल्क भरावे लागेल हे ठरेल. नवरा, बायको, मुलगा, मुलगी, नात, नातू, विधवा सून आणि विधवा नातसून ह्या नात्यांपैकी एखाद्या व्यक्तीला शेतजमीन किंवा घर जर बक्षीस द्यायचे असेल तर ते बक्षीसपत्र २०० रु मुद्रांक शुल्क भरून करता येऊ शकते. परंतु बक्षीस देण्यात येणारी मालमत्ता जर त्यायातिरिक्त इतर असेल तर मिळकतीच्या बाजारभावाच्या ३% एवढे मुद्रांक शुल्क लागेल. ह्या नातेसंबंधांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारची मालमत्ता बक्षीस द्यायची असेल तर त्याला खरेदीखताचे नियम लागू होतील. म्हणजेच मिळकतीच्या बाजारभावाच्या ५% मुद्रांक शुल्क लागेल.

बक्षीसपत्राची नोंदणी करण्यासाठी नोंदणी शुल्क हे मिळकतीच्या १% किंवा रु तीस हजार ह्या दोन्हीमधील कमी किंमत एवढे असेल.

### गहाण

कर्ज काढण्यासाठी मिळकत गहाण ठेवत असताना गहाणखत केले जाते. १०० रु पेक्षा अधिक किंमतीचे कर्ज घेतले असेल तर गहाणखात रजिस्टर करणे आवश्यक आहे. गहाणखत करत असताना दोन साक्षीदार असणे गरजेचे आहे. ते नसतील तर गहाणखत बेकायदेशीर ठरेल. गहाणखताचे ६ वेगवेगळे प्रकार कायद्यात दिलेले आहेत.

## भाडेपट्टा (लीज)

हस्तांतरणाचा चौथा प्रकारम्हणजे भाडेपट्टा. भाडेपट्टा करत असताना दोन्ही व्यक्ती सज्ञान असणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात भाडे नियंत्रण कायदा आहे, परंतु तो सर्व ठिकाणी लागू होत नाही. बऱ्याच शहरांमध्ये तो लागू होतो, पण ग्रामीण भागात होईल असे नाही. कायद्यामध्ये तो कुठे लागू होईल त्या गावांच्या नावांची यादी दिलेली आहे. ती आपल्याला बघून घ्यावी लागेल. हा कायदा जेथे लागू होतो, त्याठिकाणी भाडेपट्टा कितीही मुदतीचा असला तरी तो रजिस्टर करावाच लागतो. ज्याठिकाणी हा कायदा लागू नाही त्याठिकाणी हस्तांतरणाच्या कायद्याप्रमाणे भाडेपट्टा केला जातो. अशा वेळी मिळकतीची किंमत कितीही असली, तरी एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक काळासाठी करार करायचा असल्यास हा दस्त रजिस्टर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्याला कायदेशीर मान्यता मिळत नाही.

### अदलाबदल

हस्तांतरणाचा हा प्रकार उदाहरण घेऊन पाहू. अ आणि ब च्या प्रत्येकी दोन जमिनी आहेत. अ ची एक जमीन गावाच्या एका टोकाला आणि दुसरी दुसऱ्या टोकाला आहे. ब ची परिस्थिती ही तिच आहे. अ आणि ब ने असे ठरवले की आपण आपली एक जमीन दुसऱ्याला देऊन त्याच्याकडून एक जमीन घेऊ, जेणेकरून दोघांनाही दोन सलग जमिनी मिळतील. अशा वेळी त्यांना अदलाबदल दस्ताचा फायदा घेता येईल. दोन जमिनींची खरेदी विक्री खरेदी खताने केल्यास अधिक मुद्रांकशुल्क भरावे लागेल. अशा केसमध्ये अदलाबदल दस्ताचा पर्याय देण्यात आलेला आहे. अदलाबदल करते वेळी दोन मिळकतींपैकी ज्याची किंमत जास्त, त्या एकाच मिळकतीवर मुद्रांक शुल्क द्यावे लागते. बाकी खरेदी खताचे सर्व नियम ह्या दस्तालाही लागू आहेत. दोनपैकी कोणत्याही एका जमिनीची रक्कम १०० रुपयांपेक्षा अधिक असेल तर रजिस्टर दस्त करणे आवश्यक आहे.

पुढील कोष्टकात वर नमूद केलेले हस्तांतरणाचे काही प्रकार आणि त्यांना लागणारे मुद्रांक शुल्क ह्यांचा थोडक्यात गोषवारा घेतला आहे.

आज अनेक संस्था महिलांना वेगवेगळ्या मार्गांनी जमीन मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. उदाहरणार्थ नवीन जमीन खरेदी करताना महिलांच्या नावाने खरेदी करणे, नवऱ्याच्या मालकीच्या वडिलोपार्जित जमिनीचे वाटप करून महिलेला हिस्सा देणे, किंवा नवऱ्याच्या स्वतःच्या जमिनीमधील हिस्सा बक्षीसपत्राने महिलेला देणे. अशा प्रकारे महिलांच्या नावाने हस्तांतरण करत असताना वर उल्लेख केलेल्या कायद्यातील तरतुदी महत्वाच्या ठरतील.

**कोष्टक : मालमत्तेचे हस्तांतरण आणि त्याला लागणारे मुद्रांक शुल्क**

| हस्तांतरणाचा प्रकार | मुद्रांक शुल्कासंबंधी तपशील | मुद्रांक शुल्क | नोंदणी करणे आवश्यक आहे का | नोंदणी शुल्क |
|---|---|---|---|---|
| खरेदीखत | बाजारभावाच्या प्रमाणात.<br>संपत्ती स्थावर आहे का जंगम, तसेच कोणत्या हद्दीत आहे यावर अवलंबून | मिळकतीच्या बाजारभावाच्या ३% – ५% | होय | मिळकतीच्या १% किंवा रु तीस हजार ह्या दोन्हीतील कमी किंमत |
| बक्षीसपत्र | नातेसंबंध – नवरा, बायको, मुलगा, मुलगी, नात, नातू, विधवा सून आणि विधवा नातसून<br>मालमत्तेचा प्रकार –<br>शेतजमीन किंवा घर | २०० रु | होय | मिळकतीच्या १% किंवा रु तीस हजार ह्या दोन्हीतील कमी किंमत |
| | नातेसंबंध – नवरा, बायको, मुलगा, मुलगी, नात, नातू, विधवा सून आणि विधवा नातसून<br>मालमत्तेचा प्रकार – शेतजमीन किंवा घर याशिवाय इतर | मिळकतीच्या बाजारभावाच्या ३% | होय | मिळकतीच्या १% किंवा रु तीस हजार ह्या दोन्हीतील कमी किंमत |
| | वरील नातेसंबंधांव्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारची मालमत्ता बक्षीस देण्यासाठी | खरेदीखताप्रमाणे | होय | मिळकतीच्या १% किंवा रु तीस हजार ह्या दोन्हीतील कमी किंमत |
| वाटपपत्र | वडिलोपार्जित शेतजमीन | १०० रु | होय | मिळकतीच्या १% किंवा रु तीस हजार ह्या दोन्हीतील कमी किंमत |
| | वडिलोपार्जित इतर संपत्ती | मिळकतीच्या बाजारभावाच्या २% | होय | मिळकतीच्या १% किंवा रु तीस हजार ह्या दोन्हीतील कमी किंमत |
| हक्कसोडपत्र | वडिलोपार्जित संयुक्त संपत्तीमधील हक्क सोडण्यासाठी | २०० रु | होय | मिळकतीच्या १% किंवा रु तीस हजार ह्या दोन्हीतील कमी किंमत |

टीप – आधी म्हटल्या प्रमाणे ह्याठिकाणी नमूद केलेले मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क हे प्रशिक्षण संच तयार करत असताना लागू असणारे शुल्क आहे. त्यामध्ये पुढील काळात बदल होऊ शकतो ह्याची कृपया नोंद घ्यावी.

# सार्वजनिक संसाधनांवरील अधिकार

महिलांच्या जमिनीवरील हक्कांचा विचार करत असताना केवळ कुटुंबाच्या संपत्तीचा विचार करून पुरेसे नाही, तर जंगल, गायरान जमीन, पाण्याचे स्त्रोत इत्यादी सार्वजनीक संसाधने आणि त्यावरील महिलांचा अधिकार ह्याचा देखील विचार केला गेला पाहिजे. ह्याठिकाणी त्यादृष्टीने काही प्रमुख मुद्यांची मांडणी केली आहे.


## गायरान जमिनीवरील अधिकार

मराठवाड्यात गायरान जमिनींवरील अतिक्रमण व त्या नियमानुकूल करण्यासाठीचा लढा हा गेल्या अनेक दशकांपासून सुरु आहे. १९५० च्या दशकापासून दलित समाजाने बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून माणूस म्हणून सन्मान मिळविण्याचा लढा सुरु केला. गावातील गायरान जमिनी कसण्यासाठी ताब्यात घेणे हा त्यातील एक महत्वाचा भाग होता. ही अतिक्रमणे उदरनिर्वाहाचे एक कायमस्वरूपी साधन निर्माण करणे, स्वतःचे सामाजिक स्थान वाढवणे व आत्मसन्मान मिळवणे या उद्देशाने झालेली दिसतात. सामाजिक न्यायाच्या अंगाने या अतिक्रमणांचा व त्या नियमानुकूल होण्याच्या प्रश्नाकडे बघणे आवश्यक आहे.

शासनाने प्रथम १९७८ आणि नंतर १९९१ मध्ये गायरानावरील अतिक्रमणे नियमानुकुलित करण्याचा आदेश काढला. सध्या लागू असलेल्या १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे १४ एप्रिल १९९० रोजी अस्तित्त्वात असणारी अतिक्रमणे नियमानुकुलित करण्यात येणार आहेत. त्यानंतर वेळोवेळी नवीन शासन निर्णय काढून या नियमांची अंमलबजावणी करण्यासंबंधी आदेश काढण्यात आले आहेत.

१९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे गायरान जमीनी नियमानुकूल होताना ती पती-पत्नी दोघांच्या नावाने झाल्या पाहिजेत. परंतु प्रत्यक्षात बघितल्यास त्या केवळ पुरुषांच्या नावे होताना दिसतात.

गायरान नियमानुकूल करण्याच्या प्रक्रियेमध्ये अतिक्रमण रजिस्टर मध्ये अतिक्रमणांची नोंद करणे, ७/१२ च्या उताऱ्यावर गायरानधारक घेत असणाऱ्या पिकांची नोंद करणे, पंचनामे करणे, तसेच हे करत असताना गायरानधारक पती-पत्नी दोघांच्या नावाने करणे ह्यामध्ये तलाठ्यांची भूमिका महत्वाची आहे.



## जंगलावरील अधिकार

अनेक वर्षांच्या लढ्यानंतर सन २००६ मध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम' हा कायदा पारित करण्यात आला. ह्या वनाधिकार कायद्याने आदिवासी आणि जंगलावर अवलंबून असणाऱ्या समुदायांचा जंगलावरील हक्क प्रस्थापित झाला. कायद्याने जमीन कसण्याचे, जंगलाचा वापर करण्याचे, तसेच त्याचे संवर्धन करण्याचे अधिकार लोकांना दिले. तसेच व्यक्तिगत दिले जाणारे हक्क हे पती-पत्नी दोघांच्या संयुक्त नावाने दिले जातील असे कायद्यात नमूद करण्यात आले आहे.

## शासकीय मंजुरीचे आदेश पती-पत्नीच्या संयुक्त नावाने

महसूल आणि वन विभागाने १० ऑगस्ट १९९४ साली काढलेल्या परिपत्रकाप्रमाणे शासनातर्फे देण्यात येणारी जमीन/घरे इत्यादी पती आणि पत्नीच्या संयुक्त नावाने देण्यात येतील. एखादा पुरुष जमीन/घर मिळते वेळी अविवाहित असेल तर विवाहानंतर त्याची पत्नी आपोआप सहलाभधारक बनेल. सिलिंग कायद्यांतर्गत वितरीत होणाऱ्या जमिनी, दलित आदिवासींना वितरीत करण्यात येणाऱ्या गायरान जमिनी इत्यादी जमिनींचा ह्यात समावेश होतो.

अशा प्रकारे मिळणाऱ्या जमिनींमध्ये महिलांना हक्क मिळतो आहे का नाही हे पाहण्यात तलाठी महत्वाची भूमिका बजावू शकतात.

## कुळांचा घरठाणाच्या जमिनीवरील हक्क

मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन कायदा (१९४८) लागू झाल्या नंतर 'कसेल त्याची जमीन' ह्या तत्त्वाने जमीन कसणारी कुळे त्या जमिनीची मालक झाली. त्यावेळी कुळांचा घरठाणाच्या जमिनीवरही असाच हक्क प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने मात्र कृती झाली नव्हती. त्यादृष्टीने पहिला प्रतत्न २००० सालच्या अधिसूचनेने करण्यात आला.

### कुळांचा घरठाणाच्या जमिनीवरील हक्क – सन २००० ची अधिसूचना

(अधिसूचना, महसूल आणि वन विभाग, २९ मे २०००)

ह्या अधिसूचनेमध्ये नमूद केले होते की, महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम (१९४८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६७) याच्या कलम १७-ब चे पोटकलम (२) अन्वये मिळालेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त कायद्याच्या कलम १७-ब चे पोटकलम (२) च्या प्रयोजनासाठी १ मे २००० ही तारीख निर्दिष्ट करत आहे.

२००० च्या अधिसूचनेमधील एक महत्वाची त्रुटी अशी होती की कलम १७ ब मधील पोटकलम १ जे गावातील ठिकाणे व त्यावरील घरे या संबधी विहित रीतीने अधिकार तयार करण्याविषयी निदेश देण्याबद्दलचे आहे, ते न करता पोटकलम २ संबंधी अधिसूचना काढण्यात आली. त्यामुळे पोटकलम १७ ब ची योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे शक्य झाले नाही. ही वाट २०१७ सालच्या नवीन अधिसूचने द्वारे मोकळी झाली आहे.

### ४ जानेवारी २०१७ ची अधिसूचना

ह्या नवीन अधिसूचनेमध्ये नमूद केले आहे की महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम (१९४८चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६७) याच्या कलम १८ च्या खंड (अ) सह कलम १७-ब च्या पोटकलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे असा निदेश देते की, उक्त अधिनियम लागू असलेल्या गावातील शेतमजूर व कारागीरांच्या वस्त्यांची ठिकाणे व घरे आणि घराखालील जमिनी यासंबंधी अधिकार अभिलेख सदर अधिनियमाखालील मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन नियम १९५६ च्या नियम ११ अन्वये विहित रीतीने तयार करण्यात यावेत.'

आता ह्यापुढे प्रश्न आहे तो हा की घरठाणाची ही जमीन पती-पत्नी ह्यांच्या संयुक्त नावाने मिळणार का? ह्या अधिसूचनेमध्ये त्यासंबंधात काही भाष्य केलेले नाही. १९९४ च्या शासन निर्णयामध्ये केवळ सरकारी जमिनी आणि घरांचे वितरण होताना ते पती-पत्नीच्या संयुक्त नावाने होईल असे म्हंटले आहे. ह्यामध्ये सिलिंग खाली वितरण केलेली, गावठाण विस्तारात मिळालेली, किंवा गायरान रेग्युलराईज करून मिळालेली ह्या जमीनीचा समावेश होतो. कुळांना मिळणाऱ्या जमिनींचा ह्यात उल्लेख नाही. त्यामुळे तसे करण्यासाठी आपल्याला आग्रह धरावा लागेल, व सरकारकडे तशी मागणी करावी लागेल.



## सिंचन व्यवस्थापनात महिलांचा सहभाग

सन २००५ मध्ये महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम' हा सिंचनासंबंधी कायदा आला. सिंचन प्रकल्पांमधून कालव्याने शेतीसाठी दिल्या जाणाऱ्या पाण्याचे लोकांनी आपल्या लाभक्षेत्रात स्वतः पाणी वापर संस्थांच्या माध्यमातून नियोजन करावे हा ह्या कायद्याचा उद्देश आहे. आज ह्या कायद्याखाली महाराष्ट्रात सुमारे ३००० पाणी वापर संस्था स्थापन झालेल्या आहेत. ह्या कायद्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे ह्या कायद्याने पाणी वापर संस्थांच्या व्यवस्थापन समितीवर महिलांना आरक्षण मिळाले. कायद्याप्रमाणे समितीमध्ये ९ किंवा १२ सदस्य असतात. त्यापैकी किमान ३ सदस्य तरी महिला असल्याच पाहिजेत असे आता कायद्याने स्पष्ट केले आहे. सिंचन क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठीचे हे पहिले पाऊल आहे.

खाजगी संपत्ती बरोबरच शासनाकडून मिळणारी जमीन आणि पाणी आणि जंगल ह्यासारखी संसाधने ह्यावर महिलांचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी ह्या संबंधीचे हे कायदे समजून घेणे हे महत्वाचे आहे.

# जमिनीवरील हक्कांसंबंधीच्या प्रक्रिया


ह्या प्रकरणात महिलांना जमिनीवर हक्क मिळवून देण्यासाठी गावपातळीवर कराव्या लागणाऱ्या विविध प्रक्रिया (उदा. वारसनोंद) काय असतात, गाव पातळीवरील महसूल अधिकारी (तलाठी आणि मंडल अधिकारी) ह्यांच्याकडे जमिनीचे हक्क मिळविण्यासाठी काय प्रकारे मदत मागावी, तसेच ते आपले काम योग्य प्रकारे करताहेत वा नाही हे तपासण्यासाठी कोणते नियम लक्षात घ्यावेत ह्यासंबंधी मांडणी केली आहे. ह्याठिकाणी वारसनोंद, वाटणी, हक्कसोड, ह्या खाजगी संपत्तीच्या संबंधित महिलांच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या तीन प्रक्रियांचा विचार केलेला आहे. तसेच शासनाकडून मिळणाऱ्या जमिनीसंदर्भातील काही मुद्यांचा देखील ह्याठिकाणी समावेश केला आहे.

प्रत्यक्ष ह्या प्रक्रियांकडे वळण्याआधी जमिनीसंबंधी कागदपत्रे मिळविण्यासंबंधीची माहिती घेऊ. ७/१२, ८ अ, आणि फेरफार नोंदी हे जमिनीवरील हक्क दाखविणारे तीन प्रमुख दस्त आहेत. हे सर्व दस्त गावपातळीवर तलाठ्याकडे उपलब्ध असतात, आणि तेथून मिळवता येऊ शकतात. ह्या तीन पैकी ७/१२ आणि ८ अ च्या उताऱ्यांचे शासनातर्फे संगणीकीकरण करण्यात आले असून ते आता पुढील संकेतस्थळावर जाऊन मिळविता येऊ शकतात : https://mahabhulekh.maharashtra.gov.in/

अशाप्रकारे डिजिटल फेरफार नोंदी मात्र सध्या उपलब्ध नाहीत. त्या तलाठी कार्यालयातूनच मिळवता येऊ शकतात. अनेकदा महिला त्यांच्या समस्या घेऊन येतात त्यावेळी, जमीन नक्की कोठे आहे, कोणाच्या नावाने आहे हे त्यांना माहिती नसते. ह्या संकेतस्थळाच्या आधारे कार्यकर्त्यांना ही माहिती शोधता येऊ शकते.

## वारस नोंद

भूधारक व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याने मागे ठेवलेल्या संपत्तीवर वारसा हक्क कायद्याप्रमाणे तिच्या वारसांची नावे लावणे म्हणजे वारस नोंद. वारसनोंद ही तलाठी कार्यालयात केली जाते. योग्य पद्धतीने वारस नोंद होणे हे महिलांच्या हक्काच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे पाऊल आहे. बहुतेकवेळा वारस नोंद करून घेण्यासाठी पुरुष पुढाकार घेतात आणि महिला वारसांची नोंद करून घेत नाहीत. बहिणीला किंवा विधवा सुनेला जमिनीमध्ये वाटा द्यायला लागू नये ह्यासाठी त्यांची नावे वारसनोंदीच्या वेळी वगळली जातात. महिलांना अनेकदा वारस नोंद कशी करायची, त्यासाठी कोणती कागदपत्रे लागतात, आणि ती कोठून मिळवायची ह्या गोष्टी माहिती नसतात.



वारस नोंदीच्या प्रक्रियेतील काही ठळक मुद्दे पुढे दिले आहेत.

- खातेदार व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर तिच्या वारसांनी ३ महिन्याच्या आत वारस नोंदी साठी तलाठ्याकडे अर्ज करणे अपेक्षित आहे.
- आपल्या कार्यक्षेत्रात खातेदार व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी कुटुंबियांशी संवाद साधून त्यांना ही माहिती द्यावी. तसेच कुटुंबातील महिला वारस कोण आहेत ह्याची चौकशी करून, त्यांच्या नावाची नोंद करण्याबदल कुटुंबाचे प्रबोधन करावे.
- वारस नोंदीसाठी अर्ज करत असताना खातेदाराचा मृत्यू कधी झाला, तिच्या नावावर गावातील कोणकोणत्या गटात किती क्षेत्र होते, मयत खातेदाराचे वारस कोण कोण आहेत याची वंशवेल अशी सर्व माहिती देणे आवश्यक आहे. अर्जाबरोबर मयत व्यक्तीच्या मृत्यूचा दाखला, तिचा ८ अ चा उतारा जोडायला हवा. तसेच अर्ज देणाऱ्याचे शपथपत्र आणि सर्व वारसांचे पत्ते देखील पुरविले पाहिजेत. ह्या अर्जामध्ये मयत खातेदाराशी वारसांचे असणारे संबंध जेवढ्या सुस्पष्टपणे दाखविले असतील तेवढी ही प्रक्रिया सुकर होईल.
- वारस नोंदीच्या अर्जामध्ये मुलगी, विधवा सून, पत्नी ह्या वारस स्त्रियांच्या नावांची नोंद केली जात आहे ना ह्याची खात्री कार्यकर्त्यांनी करावी.
- वारस नोंदीचा अर्ज केल्यानंतर त्याची पोच तलाठी देईल आणि अर्जाप्रमाणे गाव नमुना ६ क (वारस नोंद वही) मध्ये वारसांच्या नावांची नोंद करेल.
- अर्ज मिळाल्यानंतर तलाठ्याने स्थानिक चौकशी करणे अपेक्षित आहे. ह्या चौकशीमध्ये तलाठी गावातील लोकांकडे अर्जात दिलेले वारस बरोबर आहेत का ह्याची माहिती घेतात. आपल्या एखाद्या केसमध्ये महिलांची नावे वारस नोंदींमधून डावलली जात आहेत असे वाटत असल्यास कार्यकर्त्यांना तलाठ्यांशी त्यासंदर्भात संपर्क साधता येईल.
- चौकशी झाल्यानंतर तसा शेरा ६ क नमुन्यामध्ये करून तलाठी अर्ज, कागदपत्र व स्थानिक चौकशीचा शेरा मंडल अधिकाऱ्यांकडे सादर करतात.
- वारस नोंद मंडल अधिकाऱ्यांकडून संमत केली जाते, आणि तशा सूचना तलाठ्यांना मिळतात. त्यानंतर तलाठी फेरफार नोंदवहीमध्ये फेरफार करतात. फेरफार प्रमाणित करण्यापूर्वी तलाठ्यांनी चावडीवर तशी नोटीस लावणे तसेच सर्व हितसंबंधितांना नोटीस पाठविणे अपेक्षित आहे. ह्याठिकाणीही महिलांचा हक्क डावलला जात आहे असे आढळल्यास कार्यकर्ते हस्तक्षेप करू शकतात.
- तक्रार आल्यास गाव नमुना क्रमांक ६ अ मध्ये (तक्रारवही) तलाठी तशी नोंद करतात, आणि त्याची पोच तक्रार करणाऱ्या व्यक्तीला देतात. त्यानंतर अर्ज करणारा आणि तक्रार करणारा ह्यांच्याबरोबर सुनावणी घेतली जाते. सुनावणीनंतर कायद्याप्रमाणे जे वारस सिद्ध होऊ शकतील त्यांच्या नावांची नोंद घेऊन त्याप्रमाणे फेरफार नोंद केली जाते.
- नोटीस काढल्यानंतर १५ दिवसांनी कोणतीही तक्रार न आल्यास तलाठी फेरफार नोंद प्रमाणित करतात.
- फेरफार नोंद प्रमाणित झाली की ७/१२ आणि ८ अ च्या नोंदींमध्ये बदल करून मयत व्यक्तीच्या ऐवजी तिच्या वारसांची नोंद केली जाते.
- एकदा फेरफार नोंद प्रमाणित झाली की त्यामध्ये बदल करण्याचा हक्क तलाठी किंवा मंडल अधिकारी ह्यांना नाही. अशा वेळी प्रांत अधिकाऱ्यांकडे अपील करावे लागेल.

## वाटणी

वारस नोंदी प्रमाणेच संपत्तीची वाटणी होताना देखील महिलांचे हक्क डावलले जाण्याच्या घटना घडतात. वाटणी करण्याचा एक प्रकार म्हणजे खातेदार व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिच्या वारसांनी त्यांच्यामध्ये जमीनीची वाटणी करणे. दुसरा प्रकार म्हणजे खातेदाराच्या हयातीत खातेफोड करून जमिनीचे वाटप करणे. वाटण्या होतात त्यावेळी मुली, पत्नी, विधवा सून ह्यांना अनेकदा त्यांचा हिस्सा दिला जात नाही. त्यांच्याकडून हक्कसोडपत्र करून घेतले जाते किंवा त्यांचा हक्क सरळ नाकारला जातो.

ह्याठिकाणी वाटणी करण्याच्या प्रक्रियेतील काही ठळक मुद्दे दिले आहेत.

- अनेकदा कुटुंबात आपापसात समजुतीने मालमत्तेची वाटणी केली जाते. परंतु महिलांचा हक्क प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने कायदेशीर वाटणी करून घेणे हितावह आहे.
- वाटणी दोन प्रकारे करता येऊ शकते –तहसीलदार कार्यालयात अर्ज करून, मुद्रांक शुल्क भरून, नोंदणीकृत दस्ताने दुय्यम निबंधक कार्यालयात त्याची नोंदणी करणे किंवा दिवाणी न्यायालयामार्फत वाटप करून घेणे
- अशा प्रकारे वाटण्या होत असताना महिला वारसांची नावे वगळली जात नाहीत ना ह्याची खात्री कार्यकर्त्यांनी करावी. कुटुंबातील व्यक्तींचे महिलांच्या हक्कांच्या संदर्भात प्रबोधन करावे.
- वाटणीसाठीचा अर्ज मंजूर होऊन फेरफारीसाठी तलाठ्यांकडे आला की वर नमूद केल्याप्रमाणे त्यांनी नोटीस काढण्याची प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित आहे. आपल्याकडे आलेल्या महिलेचा हक्क डावललला गेला असल्यास कार्यकर्त्यांना ह्याठिकाणी हस्तक्षेप करण्याची संधी आहे.
- हिंदू वारसा हक्क कायद्याच्या प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे महिलांनादेखील वाटणी मागण्याचा हक्क आहे. मुलगी आपल्या वडिलांच्या संपत्तीमध्ये, पत्नी मुलांच्या वतीने नवऱ्याच्या संपत्तीमध्ये, तसेच विधवा सून तिच्या सासऱ्यांच्या संपत्तीमध्ये वाटणी मागू शकते. कार्यकर्त्यांनी अशा केसेसमध्ये महिलांना त्यासंबंधी मार्गदर्शन करावे.
- लक्षात ठेवावे की वाटणीपत्र हे केवळ वडिलोपार्जित संपत्तीचे करता येते. स्वतंत्र संपत्तीची हिस्से करायचे असल्यास त्यासाठी बक्षीसपत्र करावे लागेल.
- अनेकदा लक्ष्मी मुक्ती परिपत्रकाच्या आधारे नवऱ्याच्या संपत्तीमध्ये वाटणी करून पत्नीच्या नावाने आर्धी जमीन करण्यासाठी तलाठ्याकडे अर्ज केला जातो. ही प्रक्रिया तलाठी पातळीवर होऊ शकत नाही हे लक्षात घ्यावे. सर्वप्रथम नवऱ्याची जमीन वडिलोपार्जित आहे का स्वतंत्र ह्याचा विचार करावा. जर ती वडिलोपार्जित असेल तर हिंदू वारसा हक्क कायद्याप्रमाणे त्यांच्या मुलांच्या हिश्शांचा विचार करून मगच वाटणी करावी. स्वतंत्र संपत्ती असेल तर पत्नीला हिस्सा देण्यासाठी बक्षीसपत्र करावे.

## हक्कसोड

महिलांना संपत्तीमधील हक्क सोडून देण्यासाठी सर्रास वापरली जाणारी ही पद्धत आहे. काही वेळा महिलांना माहेरच्या कुटुंबाकडून वडिलांच्या संपत्तीमधील त्यांचा हक्क सोडून देण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला जातो. तर अनेकदा ते आपले कर्तव्यच आहे ह्या भावनेने महिला देखील आपला हक्क सोडून देतात. त्यामागे आपण हक्क मागितल्यास आपले माहेर कायमचे तुटेल ही भावना महिलांच्या मनात असते. त्यामुळे कायद्याने मुलींना समान हक्क मिळालेला असला तरी बहुतेक वेळेला महिला आपला हक्क सोडून देतात असे दिसून येते.

हक्कसोड प्रक्रियेबद्दलचे हे काही मुद्दे

- महिलांना माहेरच्या संपत्तीमध्ये हिस्सा न देण्याची कारणे पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये दडलेली आहेत. कायद्याने मुलींना समान हक्क दिलेला असला तरी प्रत्यक्षात तो मिळविणे सोपे नाही. हा गुंतागुंतीचा प्रश्न आहे. तरीही महिलांना त्यांचा जन्माने असणारा अधिकार मिळण्याच्या दृष्टीने कार्यकर्त्यांनी महिला तसेच त्यांचे कुटुंबीय ह्यांच्याशी ह्या संदर्भात संवाद साधत राहण्याची गरज आहे.
- बहुतेक वेळा मुलगी सासरच्या गावी आहे, आणि ती काही इथे येऊन तिची जमीन कसणार नाही असा प्रश्न उपस्थित केला जातो. त्यामध्ये तथ्य देखील आहे. परंतु त्यावर मुलीने आपला हक्क पूर्णपणे सोडून देण्यापेक्षा काही वेगळी व्यवस्था करता येईल का ह्याचा विचार करावा. उदाहरणार्थ भावाने जमीन कसणे व बहिणीला त्यामधील उत्पादनाचा काही हिस्सा देणे. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ते फायद्याचे ठरेल. अशा प्रकारे महिला आणि त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधण्याचा कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावा.
- हक्कसोड पत्र तोंडी करता येणार नाही हे लक्षात घ्यावे. एखाद्या महिलेला आपला हक्क सोडून भावाला आपली जमीन द्यायची असल्यास तसे हक्कसोड पत्र मुद्रांक शुल्क करून नोंदणी करून घेतले पाहिजे.
- एखादी महिला जर हक्कसोड पत्र करत असेल तर ती त्या जमिनीवरचा हक्क सोडते आहे ह्याची तिला पूर्ण कल्पना आहे ना, तसेच ती किती आणि कोणत्या जमिनीवरचा हक्क सोडते आहे हे माहिती आहे ना, ह्याची खात्री कार्यकर्त्यांनी करून घ्यावी.

## शासनाकडून मिळणाऱ्या जमिनी

शासकीय जमिनीमध्ये गायरान जमिनी, वन जमिनी, सिलिंगच्या जमिनी या सर्वांचा समावेश होतो. ह्याठिकाणी गायरान जमिनी नियमानुकुलीत करू घेण्यासाठी कार्यकर्त्यांना काय करता येईल ह्यासंदर्भात मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. गायरान जमिनी नियमानुकुलीत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन १९७२, १९७८ आणि १९९१ असे तीन शासन निर्णय जाहीर केले. पैकी १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० या कालावधीत कमीत कमी एक वर्ष कसलेली, १४ एप्रिल १९९० रोजी अस्तित्त्वात असणारी, तसेच वास्तव्याच्या ठिकाणापासून ८ किमी अंतरावर असलेली, एकूण २ हेक्टर गायरान अतिक्रमणे नियमानुकुलीत होऊ शकतात. तसेच नियमानुकुलीत होत असताना ह्या जमिनी पती-पत्नी दोघांच्या संयुक्त नावाने मिळणे अपेक्षित आहे. १९९१ साली हा शासन निर्णय येऊन सुद्धा अजून बरीचशी गायरान अतिक्रमणे नियमानुकुलीत झालेली नाहीत. काही गायरान जमिनींचा अतिक्रमण यादीत समावेश आहे व काहींचा नाही. व या दोन्ही जमिनी नियमानुकुलीत करून घेण्यासाठीची कार्यपद्धती वेगळी आहे. जिल्हा पातळीवरील अतिक्रमणाच्या यादीत समाविष्ट असलेल्या जमिनीला नियमानुकूल करवून घेण्यासाठी कार्यकर्त्यांनी खालील प्रक्रिया करावी

- तहसीलदार यांना अतिक्रमणे नियमानुकूल करून घेण्याबाबतचा अर्ज देणे
- अतिक्रमण धारकाने अतिक्रमणाच्या संपूर्ण कालावधीचा दंड भरणे
- दंड भरल्यानंतर तहसीलदारांकडून सनद (प्रमाणपत्र) पट्टा मिळवून घेणे
- त्या सनदेची झेरोक्स प्रत व फेरफार बदल बाबतचा अर्ज तलाठ्याकडे करणे
- ७/१२ चा उतारा मिळविणे
- जमिनीची मोजणी करून घेऊन तिची हद्द व खुणा करून घेणे

ज्या अतिक्रमणांची नोंद यादीत नाही अशी अतिक्रमणे सिद्ध करण्याची जबाबदारी अतिक्रमण करणाऱ्यांची आहे. तसे पुरावे जर ते देऊ शकले नाहीत तर अतिक्रमण नियमानुकूल होणार नाही. त्यामुळे नियमानुकूल करून घेण्यासाठी खालील पुरावे अतिक्रमणधारकांनी / कार्यकर्त्यांनी गोळा करणे गरजेचे आहे

- आपले अतिक्रमण १४ एप्रिल १९९० रोजी अस्तित्वात होते हे सिद्ध करण्यासाठी गावच्या कागदपत्रात अतिक्रमणाची नोंद
- सदर जमिनीशी संबंधित ७/१२ वरील पिक पाहणीची नोंद
- अतिक्रमण रजिस्टर – गाव नमुना १(ई) मधील नोंद.
- गायरान जमिनी ग्रामपंचायतीकडे सुपूर्द केल्याची नोंदवही – (गाव नमुना १(क) मधील संबंधित कागदपत्रांच्या समोर केलेली नोंद
- अतिक्रमण रकमेचा तपशील, पिक जप्त केल्याबद्दलचा पंचनामा, लिलावाची नोटीस वगैरे संबंधित कागदपत्रांच्या नकला
- अतिक्रमण नियमानुकूल करावे म्हणून पूर्वी केलेले अर्ज, त्यांच्या पोहोचपावत्या, पाठवलेली आठवणपत्रे तसेच अशा अर्जातून झालेल्या चौकशीबद्दल काढलेल्या नोटीसा इत्यादी
- १४ एप्रिल १९९० रोजी अतिक्रमण अस्तित्वात होते हे सिद्ध करण्यासाठी अतिक्रमित जमिनीवर १९८९–९० व १९९०–९१ या दोन सालात लागवड करून पीक घेतले असल्याबद्दलचा पुरावा

१९९१ च्या गायरान नियमानुकुलीत करण्याच्या शासन निर्णयाप्रमाणे नियमानुकुलीत होत असताना ह्या जमिनी पती–पत्नी दोघांच्या संयुक्त नावाने मिळणे अपेक्षित आहे. तसेच १९९४ च्या शासनाच्या परिपत्रकामध्येही हे नमूद केलेले आहे, की सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या सर्व जमिनी ह्या पतीपत्नी दोघांच्या संयुक्त नावाने दिल्या जातील. परंतु प्रत्यक्षात मात्र गायरान जमिनी कुटुंबातील पुरुषांच्या नावाने नियमानुकुलीत होतात असे दिसते.

त्यामुळे संस्थेतील कार्यकर्त्यांनी अशा प्रकारच्या जमिनींसाठी अर्ज करत असताना तो पती–पत्नी दोघांच्या नावाने केला जाईल अशी दक्षता घ्यावी. तसेच पंचनाम्याच्या वेळेस तलाठी व मंडळ अधिकारी ते पती–पत्नी दोघांच्या नावे करत आहेत किंवा कसे याकडे लक्ष द्यावे व त्यासाठी आग्रह धरावा. तसेच प्रत्यक्षात जमीन त्या प्रकारे न मिळाल्यास तलाठी, मंडल अधिकारी ह्यांना परिपत्रकाबद्दल माहिती देऊन तशा नोंदी करण्याबाबत त्यांच्याशी संवाद साधावा.

## वारसा नोंदीसाठी शासनाचे उपक्रम

वेळोवेळी शासनाच्या महाराजस्व अभियानाअंतर्गत किंवा शासनाने ठरवलेल्या इतर अभियानाच्या वेळेस शासन निर्णय/ परिपत्रक किंवा पत्राद्वारे वारस नोंदीचे कॅम्पस घेतले जातात. अशा वेळेस महिलांपर्यंत त्या कॅम्पबाबत माहिती पोहचविण्यासाठी मोहीम राबवणे किंवा पोस्टर्स इत्यादी साहित्याच्या माध्यमातून महिलांच्या जमिनीवरील हक्कांबाबत जाणीव जागृती करणे संस्थेतील कार्यकर्त्यांना शक्य आहे. तसेच अशा कॅम्पच्या वेळेस संस्थेच्या संपर्कात असलेल्या महिला वारस नोंद करून घेतील याकडे लक्ष देणेही संस्थांना शक्य आहे.

# थोडक्यात महत्वाचे...

ह्याआधीच्या सर्व प्रकरणांमध्ये आपण महिला आणि जमिनीवरील हक्कांसंबंधी वेगवेगळ्या कायद्यांची माहिती घेतली. ह्या शेवटच्या प्रकरणात त्या सगळ्याचा थोडक्यात गोषवारा घेऊन, त्याच्या आधारे संस्थांकडे मदतीसाठी येणाऱ्या महिलांना कार्यकर्ते काय प्रकारे मदत करू शकतात ह्या संबंधी मांडणी केली आहे. मांडणी सुकर होण्याच्या दृष्टीने ज्या विविध प्रकारच्या केसेस संस्थांकडे येतात (उदा विधवा महिला, परित्यक्ता महिला इत्यादी) त्याप्रमाणे मांडणी केलेली आहे.

## महिलेचा माहेरच्या कुटुंबातील संपत्तीमधील हक्क

### हिंदू स्त्रियांचा माहेरच्या संपत्तीमधील हक्क

आपल्याकडे महिला जेव्हा सासरच्या संपत्तीमधील हिस्सा मागण्यासाठी येते त्यावेळी तो मिळवताना तिची वैवाहिक स्थिती काय आहे, तिला मुले आहेत अथवा नाहीत इत्यादी गोष्टी महत्वाच्या ठरतात. परंतु माहेरच्या कुटुंबातील संपत्तीमधील हक्क मात्र त्यावर अवलंबून नाही.

महिलेला तिच्या माहेरील संपत्तीमध्ये हिस्सा मिळवून देताना ती संपत्ती नक्की कोणाची आणि कोणत्या प्रकारची आहे ह्याचा विचार करायला हवा.

**वडिलांची वडिलोपार्जित संपत्ती**

२००५ च्या हिंदू वारसा सुधारणा कायद्याने वडिलोपार्जित संपत्तीमध्ये मुलींना मुलांच्या बरोबरीने हक्क मिळाला आहे. म्हणजेच एखाद्या महिलेला तिच्या वडिलांच्या वडिलोपार्जित जमिनीमध्ये तिला भावाच्या एवढाच हक्क मिळेल. तो तिला मिळविण्यासाठी पुढील गोष्टी कराव्या लागतील.

- त्या महिलेच्या वडिलांच्या मृत्यूनंतर तीन महिन्याच्या आत वारसनोंदीसाठी अर्ज करून त्यामध्ये तिचे नाव समाविष्ट होईल ह्याची खबरदारी घेणे.
- वारसनोंद झाल्यानंतर तिला स्वतःचा हिस्सा वेगळा करून हवा असल्यास वाटणीसाठीचा अर्ज करावा लागेल. ह्या दोन्हीसंबंधीची प्रक्रिया ह्याआधीच्या प्रकरणात सविस्तर दिली आहे
- वडिलांच्या मृत्यूनंतर तिला वडिलोपार्जित संपत्तीमध्ये हिस्सा मिळेलच, परंतु त्यांच्या हयातीत देखील त्यामध्ये हिस्सा मागण्याचा तिला पूर्ण हक्क आहे.
- वडिलोपार्जित संपत्तीमधील तिचा हिस्सा कोणी नाकारू शकत नाही.
- वडिलोपार्जित जमिनीमधील हिस्सा महिलांनी सोडून द्यावा ह्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला जातो. जोवर महिला रितसर हक्कसोडपत्र करून देत नाही, तोवर तिचा संपत्तीमधील हक्क कायम राहतो.

**वडिलांची स्वतंत्र संपत्ती**

- वडिलोपार्जित संपत्तीमध्ये जसा मुलीला जन्माने हक्क आहे तसा तो वडिलांच्या स्वतंत्र संपत्तीमध्ये नाही. त्यामुळे तिच्या वडिलांनी त्यांच्या मृत्यूपूर्वी त्या संपत्तीचे बक्षीसपत्र, विक्री, किंवा मृत्यूपत्र इत्यादीद्वारे वाटप करून टाकले तर तिला त्यामध्ये हक्क मिळणार नाही. परंतु त्यांच्या मृत्यूच्या वेळी त्यांनी मृत्यूपत्र केले नसेल, तर त्या जमिनीमध्ये तिला तिचा हिस्सा मिळेल.
- त्यासाठी वारसनोंद आणि वाटणीची प्रक्रिया वरीलप्रमाणेच राहिल.
- वडिलांच्या हयातीत त्यांना आपल्या स्वतंत्र संपत्तीमधून मुलीला हिस्सा द्यायचा असल्यास बक्षीसपत्र करून देता येईल.

**आईची संपत्ती**

- हिंदू वारसा हक्क कायद्याप्रमाणे स्त्रीला आपल्या संपत्तीचे बक्षीसपत्र, विक्री, किंवा मृत्यूपत्र इत्यादीद्वारे वाटप करण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे एखाद्या महिलेच्या आईने तिच्या संपत्तीचे अशा प्रकारे वाटप करून टाकल्यास महिलेला त्यामध्ये हक्क मिळणार नाही. परंतु आईच्या मृत्यूच्या वेळी जर तिने मृत्यूपत्र केले नसेल तर आईची वारस म्हणून त्या महिलेला त्या संपत्तीमध्ये तिचा हिस्सा मिळेल.
- त्यासाठी वारसनोंद आणि वाटणीची प्रक्रिया वरीलप्रमाणेच राहिल.
- आईच्या हयातीत तिला आपल्या स्वतंत्र संपत्तीमधून मुलीला हिस्सा द्यायचा असल्यास बक्षीसपत्र करून देता येईल.

## मुस्लीम स्त्रियांचा माहेरच्या संपत्तीमधील हक्क

मुस्लीम वारसा कायद्याप्रमाणे स्त्रियांना त्यांच्या वडील आणि आई दोघांच्या संपत्तीमध्ये हिस्सा मिळेल. तसेच हिंदू वारसा कायद्याप्रमाणे संपत्तीचे वडिलोपार्जित आणि स्वतंत्र असे हिस्से मुस्लीम कायद्यात केलेले नाहीत. तो हिस्सा किती असेल त्या संबंधीचे नियम सविस्तरपणे मुस्लीम कायद्यासंबंधीच्या प्रकरणात दिले आहेत.

वारसनोंद तसेच वाटणीची प्रक्रिया ही मागील प्रकरणात दिल्या प्रमाणेच राहिल.

# विवाहित महिलांचा सासरच्या संपत्तीमधील अधिकार

## हिंदू विवाहित स्त्रियांचा सासरच्या संपत्तीमधील अधिकार

वर नमूद केल्याप्रमाणेच हिंदू स्त्रीच्या नवऱ्याच्या संपत्तीबद्दल विचार करत असताना ती संपत्ती वडिलोपार्जित आहे का स्वतंत्र ह्याचा विचार करावा लागेल.

**नवऱ्याची वडिलोपार्जित संपत्ती**

नवरा आणि मुले यांच्यात वडिलोपार्जित संपत्तीच्या वाटण्या होतील त्या वेळी विवाहित स्त्रीला तिचा हिस्सा मिळेल. परंतू तिला स्वतः हिस्सा मागण्याचा हक्क नाही. ती अज्ञान मुलांच्या वतीने वाटणीसाठी मागणी करू शकते. अशी वाटणी ज्यावेळी होईल त्यावेळी मुलांच्या बरोबरीने तिला देखील तिचा हिस्सा मिळेल.

नवऱ्याच्या वडिलोपार्जित संपत्तीमध्ये महिलेला हिस्सा मिळवून द्यायचा असल्यास त्या जमिनीच्या वाटण्या करून, मुलांच्या बरोबरीने तिला तिचा हिस्सा देणे हा सर्वात योग्य मार्ग राहिल. अनेकदा स्त्रियांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या संस्था–संघटना मुलांचा वडिलोपार्जित जमिनीमध्ये जन्माने हक्क आहे हे तत्व विचारात न घेता पतीची आर्धी वडिलोपार्जित संपत्ती पत्नीच्या नावाने करून घेण्यास मदत करतात. हे कायद्याला धरून नाही ह्याची नोंद घेणे आवश्यक आहे.

#### नवऱ्याची स्वतंत्र संपत्ती

पुरुषाला त्याच्या स्वतंत्र जमिनीचे बक्षीसपत्र, विक्री, किंवा मृत्यूपत्र इत्यादीद्वारे वाटप करण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामध्ये वाटणी मागण्याचा हक्क मुलांनादेखील नाही. त्यामुळे त्याने तसे केल्यास त्याच्या पत्नीला त्यामध्ये हिस्सा मिळू शकणार नाही.

नवऱ्याच्या स्वतंत्र संपत्तीमधून महिलेला हिस्सा द्यायचा असल्यास बक्षीसपत्र करून तो देणे हा सर्वात योग्य मार्ग राहिल. त्यासंबंधीची प्रक्रिया आधीच्या प्रकरणात सविस्तरपणे दिली आहे.

### मुस्लीम विवाहित स्त्रियांचा सासरच्या संपत्तीमधील अधिकार

मुस्लीम कायद्याप्रमाणे व्यक्तीला तिच्या हयातीत आपल्या संपत्तीचे हवे तसे वाटप करण्याचा हक्क आहे. त्यामुळे नवऱ्याच्या संपत्तीत महिलेला हिस्सा द्यायचा असेल तर बक्षीसपत्र करून देता येईल.

## विधवा स्त्रियांचा सासरच्या संपत्तीमधील अधिकार

### हिंदू विधवा स्त्रियांचा सासरच्या संपत्तीमधील अधिकार

#### नवऱ्याची वडिलोपार्जित संपत्ती

हिंदू स्त्रीला तिच्या पतीच्या मृत्यूनंतर त्याच्या वडिलोपार्जित संपत्तीमध्ये मुलांच्या बरोबरीने हिस्सा मिळेल. तिला हा हक्क मिळवून देण्यासाठी वारसनोंद करत असताना त्यामध्ये तिचे नाव समाविष्ट केले जात आहे ना ह्याची खात्री करून घ्यावी लागेल.

जर एखाद्या महिलेच्या पतीच्या मृत्यूच्या वेळी जमीन खातेफोड होऊन त्याच्या नावाने झाली नसेल, आणि ती त्या महिलेच्या सासऱ्यांच्या नावाने असेल, तर नवऱ्याच्या मृत्यूनंतर ती महिला सासऱ्यांकडे वाटणीची मागणी करून तिच्या नवऱ्याच्या हिश्शाची जमीन स्वतः आणि तिच्या मुलांसाठी मागू शकते.

#### नवऱ्याची स्वतंत्र संपत्ती

पुरुषाला त्याच्या स्वतंत्र जमिनीचे बक्षीसपत्र, विक्री, किंवा मृत्यूपत्र इत्यादीद्वारे वाटप करण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे त्याने तसे केल्यास विधवा पत्नीला त्याच्या संपत्तीमध्ये हिस्सा मिळणार नाही. परंतु त्याने मृत्यूपत्र केले नसल्यास त्याच्या मृत्यूनंतर विधवा पत्नीला मुलांच्या बरोबरीने हिस्सा मिळेल.

### मुस्लीम विधवा स्त्रियांचा सासरच्या संपत्तीमधील अधिकार

मुस्लीम कायद्याने विधवा पत्नीला नवऱ्याच्या संपत्तीमध्ये ठराविक हिस्सा देऊ केलेला आहे. तो किती असेल ह्याबाबतची सविस्तर माहिती मुस्लीम कायद्यासंबंधी प्रकरणात दिली आहे.

मुस्लीम कायद्याप्रमाणे विधवा सुनेला मात्र सासरा किंवा सासू ह्यांच्या संपत्तीमध्ये हिस्सा मिळत नाही.

# घटस्फोटीत स्त्रियांचा सासरच्या संपत्तीमधील अधिकार

## हिंदू घटस्फोटीत स्त्रियांचा सासरच्या संपत्तीमधील अधिकार

एकदा घटस्फोट झाल्यानंतर पती-पत्नीचे नाते संपुष्टात आले असल्याने नवऱ्याच्या मृत्यूनंतर वारस म्हणून किंवा त्याच्या संपत्तीचे विभाजन होईल त्यावेळी महिलेला संपत्तीमध्ये हक्क सांगता येणार नाही. मात्र तिच्या मुलांना वडिलांच्या वडिलोपार्जित संपत्तीमध्ये जन्माने हक्क असल्यामुळे त्यांना त्यामध्ये हक्क मिळेल. तसेच तिच्या नवऱ्याने त्याच्या स्वतंत्र संपत्तीचे मृत्यूपत्र केले नसल्यास त्यामध्येही तिच्या मुलांना कायद्याने त्यांचा हक्क मिळेल.

## मुस्लीम घटस्फोटीत स्त्रियांचा सासरच्या संपत्तीमधील अधिकार

एकदा घटस्फोट झाल्यानंतर पती-पत्नीचे नाते संपुष्टात आले असल्याने नवऱ्याच्या मृत्यूनंतर वारस म्हणून महिलेला संपत्तीमध्ये हक्क सांगता येणार नाही.

# परित्यक्ता स्त्रियांचा सासरच्या संपत्तीमधील अधिकार

## हिंदू परित्यक्ता स्त्रियांचा सासरच्या संपत्तीमधील अधिकार

ग्रामीण महाराष्ट्रात परित्यक्ता स्त्रियांचे प्रमाण मोठे आहे. एकदा सासरच्या घरातून बाहेर पडल्यावर स्त्रीला नवऱ्याच्या संपत्तीमध्ये हक्क मिळविणे बहुतेक वेळेला अशक्य होते. परित्यक्ता स्त्री आपल्या अज्ञान मुलांच्या वतीने नवऱ्याच्या वडिलोपार्जित संपत्तीमध्ये हिस्सा मागू शकते. परित्यक्ता स्त्रीचा घटस्फोट झालेला नसल्याने, म्हणजेच ती अजूनही कायदेशीर पत्नी असल्याने, मुलांच्या बरोबरीने तिलाही संपत्तीमध्ये हिस्सा मिळेल.

त्या महिलेच्या नवऱ्याने तिला घटस्फोट न देताच दुसरे लग्न केले असेल तर संपत्तीमध्ये हिस्सा मिळविणे अधिक कठीण होते. अशा परिस्थितीमध्ये ती महिला ही तिच्या नवऱ्याची कायदेशीर पत्नी आहे हे सिद्ध करावे लागेल.

## मुस्लीम परित्यक्ता स्त्रियांचा सासरच्या संपत्तीमधील अधिकार

परित्यक्ता स्त्रीला तिच्या नवऱ्याच्या संपत्तीत हक्क मागता येणार नाही.

## समारोप

सदरचे प्रशिक्षण साहित्य हे ग्रामीण महिलांच्या जमीन व घराच्या हक्कांबाबत काम करणाऱ्या व करण्यास इच्छुक असणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी उपयोगी ठरेल अशी अपेक्षा आहे. ह्यामध्ये सध्या अस्तित्वात असणाऱ्या कायद्यांचे सोप्या पद्धतीने संकलन करण्याचा प्रवत्न केला आहे. महिलांच्या दृष्टीने ह्या कायद्यांची योग्य अंमलबजावणी व्हावी हा या प्रशिक्षण साहित्याचा उद्देश आहे.

C/o **सोपेकॉम**
१६ काळे पार्क, सोमेश्वरवाडी रोड,
पाषाण, पुणे ४११००८
फोन : ०२० २५८८६५४२
इमेल : makaam.maharashtragmail.com

SOPPECOM